दैनिक
जनता आवाज

अहिल्यानगर | वर्ष ०३ रे | अंक २२९ वा | शनिवार, दि. ३१ ऑक्टोबर २०२६ | RNI No. MAHMAR/2022/85155 | पाने ०८ | किंमत ४ रुपये

चिंचोली फाट्यावर चोरट्यांचा धुमाकूळ

राहुरी : तालुक्यातील चिंचोली फाटा येथे महिलेच्या राहत्या घरातून अज्ञात चोरट्याने रोख रक्कम, मोबाईल फोन व काळी पर्स असा एकूण ९८ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी वैशाली सुकलाल वाघ (वय ३५, रा. चिंचोली फाटा, ता. राहुरी) यांच्या फिर्यादीवरून राहुरी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वैशाली वाघ या जत्रांमध्ये खेळणी व बांगड्यांचे दुकान लावून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. २८ ऑक्टोबर रोजी सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास मोटारसायकलवरून चिंचोली फाटा येथील घरी आल्या. घरी आल्यानंतर त्यांनी जत्रेतील दुकानाच्या व्यवसायातून मिळालेली ८० हजार रुपयांची रोख रक्कम आणि मोबाईल फोन काळ्या रंगाच्या पर्समध्ये ठेवला होता.

आजचे हवामान

कमाल	किमान
31°C	21°C

पेट्रोल	डिझेल
111.71	98.38

सोने	चांदी
1,40,337	1,82,246

चारा टंचाईवर शासनाचा 'मास्टर प्लॅन'

दुष्काळग्रस्तांसाठी राज्य सरकारचा मोठा निर्णय; सुका चारा १२, तर मुरघास ८ रुपये किलो

३०४ तालुक्यांतील संभाव्य चारा टंचाईवर मात करण्यासाठी शासनाची तयारी; वाहतूक खर्च स्वतंत्रपणे देण्याची तरतूद

जनता आवाज वृत्तसेवा

मुंबई : राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकरी आणि पशुपालकांना मोठा दिलासा देणारा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. २०२६ मधील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील ३०४ तालुक्यांमध्ये संभाव्य चारा टंचाई निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन शासनाने सुका चारा आणि मुरघास खरेदीचे कमाल दर निश्चित केले आहेत. त्यानुसार सुका चारा प्रतिकिलो कमाल १२ रुपये, तर मुरघास प्रतिकिलो कमाल ८ रुपये दराने खरेदी करण्यास सरकारने मान्यता दिली आहे. या निर्णयामुळे दुष्काळी भागातील पशुधनासाठी चारा उपलब्ध करून देण्याच्या शासकीय नियोजनाला वेग येणार आहे.

महसूल मंत्री तथा दुष्काळ निवारण समितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या निर्णयानंतर काल, ३० ऑक्टोबर रोजी यासंदर्भातील शासन निर्णय जारी करण्यात आला. २०२६-२७ या दुष्काळाच्या कालावधीत या निश्चित दरानुसार सुका चारा आणि मुरघासाची खरेदी केली जाणार आहे.

राज्यात यंदा दुष्काळी परिस्थिती गंभीर होत असून अनेक भागांत पाणी उपलब्धतेसोबतच पशुधनाच्या चाऱ्याचा प्रश्नही निर्माण होण्याची शक्यता आहे. दुष्काळाचा कालावधी वाढल्यास शेतकऱ्यांकडे उपलब्ध असलेला चारा संपण्याची शक्यता असते. त्यामुळे पशुधनाचे संगोपन करणे शेतकरी आणि पशुपालकांसाठी मोठे आव्हान ठरते. ही संभाव्य परिस्थिती लक्षात घेऊन शासनाने आधीच चारा खरेदीचे दर निश्चित करून उपाययोजनांना सुरुवात केली आहे.

सरकारने चारा खरेदीसाठी केवळ दर निश्चित केले नसून त्याच्या गुणवत्तेबाबतही स्पष्ट निकष घातले आहेत. खरेदी करण्यात येणारा सुका चारा चांगल्या दर्जाचा असणे आवश्यक आहे. चाऱ्याला आंबट किंवा कुबट वास नसावा. तसेच त्याला बुरशी, माती किंवा कीड लागलेली नसावी, अशा अटी घालण्यात आल्या आहेत.

सुक्या चाऱ्याच्या खरेदीमध्ये ज्वारी आणि बाजरीच्या चाऱ्याला प्राधान्य देण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. याशिवाय सुक्या चाऱ्यातील ओलाव्याचे प्रमाण १५ टक्क्यांपेक्षा जास्त नसावे, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे चारा खरेदी करताना त्याचा दर्जा आणि पशुधनासाठी त्याची (पान ४ वर)

चारा खरेदीचे कमाल दर

- सुका चारा : १२ रुपये प्रतिकिलो
- मुरघास : ८ रुपये प्रतिकिलो
- सुक्या चाऱ्यातील कमाल ओलावा : १५ टक्के
- वाहतूक खर्च : खरेदी दरापेक्षा स्वतंत्र

अभ्यासगटाच्या शिफारशीला मंजुरी

सुका चारा आणि मुरघास खरेदी करण्यासाठी योग्य दर निश्चित करण्याच्या उद्देशाने शासनाने अभ्यासगटाची स्थापना केली होती. या अभ्यासगटाने चाऱ्याच्या उपलब्धतेसह उत्पादन, गुणवत्ता आणि खरेदीच्या विविध बाबींचा विचार करून दर निश्चित करण्याची शिफारस केली होती. या शिफारशींवर २७ ऑक्टोबर रोजी झालेल्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत चर्चा करण्यात आली. त्यानंतर सुका चारा आणि मुरघासासाठी निश्चित केलेल्या दरांना मान्यता देण्यात आली.

पशुधनासाठी उपाययोजनांना वेग

दुष्काळी परिस्थितीत पाण्याइतकाच चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनतो. चारा उपलब्ध नसल्याने पशुपालकांवर पशुधन विकण्याची वेळ येऊ शकते. त्यामुळे दुष्काळी भागात चाऱ्याची उपलब्धता कायम ठेवणे आवश्यक आहे. शासनाने निश्चित केलेले दर आणि गुणवत्ता निकष यामुळे चारा खरेदीचे नियोजन सुलभ होण्याची अपेक्षा आहे.

संमिश्र

रशियाशी संघर्ष महागात पडेल : पुतीन

मॉस्को : रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी युरोपीय देशांना इशारा दिला आहे की, रशियासोबतचा संघर्ष वाढवणे त्यांच्यासाठी महागात पडू शकते. मॉस्कोमध्ये पत्रकारांशी संवाद साधताना पुतिन म्हणाले की, बाल्टिक समुद्रातील जहाजांची वाहतूक रोखण्याचा प्रयत्न केला गेला, तर तिथेही होर्मुझसारखी परिस्थिती निर्माण होऊ शकते. पुतिन म्हणाले की, रशियाला युरोपसोबत युद्ध नको आहे; मात्र एखादा देश रशियाशी संघर्ष करीत असेल, तर त्याने त्याच्या परिणामांसाठी तयार राहिले पाहिजे. त्यांनी इशारा दिला की, तणाव खूप वाढला, तर कोणाचाही विजय होणार नाही.

'राज्याचे नेतृत्व एकनाथ शिंदेंकडे द्या'

मुंबई : विधान परिषद निवडणुकीतील महायुतीच्या कामगिरीनंतर राज्यातील राजकीय वातावरण तापलं आहे. या निकालाला राज्याच्या नेतृत्वाचा पराभव असल्याचे सांगत, राज्याचे नेतृत्व बदलून ते पुन्हा एकदा एकनाथ शिंदे यांच्याकडे दिले पाहिजे, या आपल्या मागणीचा शिवसेना नेते रवींद्र धंगेकर यांनी पुनरुच्चार केला आहे. यासोबतच, शिवसेनेवर युतीधर्म न पाळल्याचा आरोप करणारे भाजप प्रवक्ते नवनाथ बन यांच्यावरही त्यांनी ते पगारी माणूस आहेत, त्यांचे काय ऐकता? अशी टीका केली आहे. या निवडणुकांच्या निकालाचे विश्लेषण करताना धंगेकर यांनी राज्यातील सध्याच्या नेतृत्वावर अप्रत्यक्षरीत्या निशाणा साधला.

डेहराडूनला येणारे हेलिकॉप्टर क्रॅश

चमोली : शुक्रवारी उत्तराखंडमधील जोशीमठजवळ बद्रीनाथहून डेहराडूनला जाणारे एक खासगी हेलिकॉप्टर कोसळले. या अपघातात पायलटसह सहा जणांचा मृत्यू झाला. सर्वांचे मृतदेह सापडले आहेत. हे हेलिकॉप्टर दुपारी सुमारे १:१४ वाजता बद्रीनाथहून डेहराडूनमधील सहस्रधारासाठी निघाले होते. जोशीमठ खोऱ्यावरून उडत असताना त्याचा संपर्क तुटला. त्यानंतर ट्रॅकिंग सिस्टीमने त्याचे स्थान गमावले. ही घटना अशा वेळी घडली, जेव्हा उत्तराखंडच्या अनेक भागांमध्ये पाऊस आणि बर्फवृष्टी होत असल्याने हवामान खराब होते. केंद्र सरकारच्या माहितीनुसार, २०१६ ते २०२६ दरम्यान उत्तराखंडमध्ये हेलिकॉप्टरच्या १२ दुर्घटना घडल्या, ज्यात २१ जणांचा मृत्यू झाला.



एकतानगरमध्ये 'संजीवनी'चा राष्ट्रनाद

पंतप्रधान मोदींच्या उपस्थितीत ब्रास बँड पथकाचे सादरीकरण

जनता आवाज वृत्तसेवा

कोपरगाव : राष्ट्रीय एकता दिनानिमित्त आज, ३१ ऑक्टोबर रोजी गुजरातमधील एकतानगर येथे होणाऱ्या एकता परेड-२०२६ मध्ये संजीवनी सैनिकी स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजचे ब्रास बँड पथक आपल्या सुरेल व शिस्तबद्ध वादनाने राष्ट्रीय मंचावर महाराष्ट्राचा गौरव वाढविणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत होणाऱ्या या दिमाखदार सोहळ्यात सादरीकरण करण्याचा बहुमान विध्यार्थ्यांना मिळाला असून, त्यांच्या वादनातून संजीवनीचा राष्ट्रीय नाद घुमणार आहे.

भारत सरकारच्या गृह मंत्रालयाने ९ सप्टेंबर २०२६ रोजी पाठविलेल्या अधिकृत पत्रानुसार, संजीवनीच्या ब्रास बँड पथकाची स्कूल बँड डिस्प्लेमधील बॉईज ब्रास बँड श्रेणीसाठी निवड झाली. त्यानुसार २१ ऑक्टोबरपासून एकतानगर येथे देशभरातील निवडक शालेय (पान ४ वर)

ग्रामीण विद्यार्थ्यांनी गाजवला राष्ट्रीय स्तर

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही योग्य प्रशिक्षण, संधी आणि जिद्दीच्या बळावर राष्ट्रीय स्तरावर आपली गुणवत्ता सिद्ध करता येते, हे संजीवनीच्या पथकाने दाखवून दिले आहे. आजचे सादरीकरण म्हणजे केवळ वादन नव्हे, तर शिस्त, मेहनत, सांघिक भावना आणि राष्ट्रप्रेमाचा गौरवपूर्ण आविष्कार ठरणार आहे. कोपरगावसह संपूर्ण महाराष्ट्रासाठी ही निश्चितच अभिमानास्पद कामगिरी आहे.

गडकिल्ल्यांना मिळणार संरक्षण कवच

प्रतापगड, राजगड, साल्हेर, खांदेरी किल्ल्यांवर जवानांचा पहारा

जिल्हा नियोजनातून ३ टक्के निधी

जनता आवाज वृत्तसेवा

मुंबई : महाराष्ट्राची ओळख असलेल्या गडकिल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व जपत त्यांच्या संवर्धनाला अधिक बळ देण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. राज्यातील गडकिल्ले, ऐतिहासिक वास्तू तसेच मंदिरांच्या संवर्धनासाठी आता जिल्हा नियोजन विकास समितीच्या निधीतून ३ टक्के निधी राखीव ठेवण्यात येणार आहे. या निधीतून करण्यात येणाऱ्या संवर्धनाच्या कामांना राज्याच्या पुरातत्त्व विभागाकडून तांत्रिक मान्यता देण्यात येणार असल्याची घोषणा सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी केली.

महाराष्ट्रातील किल्ले हे केवळ पर्यटनस्थळे नसून राज्याच्या (पान ४ वर)

इतिहास अन् पर्यटनाचा संगम

महाराष्ट्रातील गडकिल्ले आणि ऐतिहासिक वास्तूंचे संवर्धन करताना पर्यटनाला चालना देण्यावरही सरकारचा भर आहे. विविध सांस्कृतिक कार्यक्रम आणि उपक्रमांच्या माध्यमातून आतापर्यंत ५०० हून अधिक पर्यटकांना ऐतिहासिक वारसा स्थळांशी जोडण्यात आले आहे.

राज्यात तीन महिन्यांत राजकीय भूकंप?

सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाटांच्या वक्तव्याने राजकीय वर्तुळात खळबळ

जनता आवाज वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर : विधानपरिषद निवडणुकीच्या निकालानंतर महायुतीतील घटकपक्षांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू असतानाच शिंदेसेनेचे नेते तथा सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात आगामी काळात मोठ्या उलथापालथीचे संकेत दिले आहेत. येत्या तीन ते चार महिन्यांत राज्याच्या राजकारणात मोठ्या घडामोडी घडण्याची शक्यता असून पडद्यामागे काहीतरी मोठे शिजत आहे, असे सूचक वक्तव्य शिरसाट यांनी केले. त्यांच्या या वक्तव्यामुळे राजकीय चर्चांना उधाण आले आहे.

मंत्री शिरसाट यांनी सध्याच्या राजकीय परिस्थितीवर भाष्य केले. राज्यात एकीकडे मुख्यमंत्री बदलाची चर्चा सुरू होते, तर दुसरीकडे पुन्हा एकदा एकनाथ शिंदे यांचे नाव पुढे येते. त्यामुळे सध्याची राजकीय समीकरणे अत्यंत संभ्रम निर्माण करणारी आहेत. नेमके काय घडणार, हे आत्ताच ठामपणे सांगता येणार नसले तरी आगामी तीन-चार महिन्यांत मोठी राजकीय उलथापालथ होण्याची शक्यता असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

शिरसाट म्हणाले की, सध्याच्या परिस्थितीकडे पाहता राजकारणातील जाणकारांकडून विविध प्रकारचे (पान ४ वर)

> महायुतीत राहून महायुतीच्या उमेदवारांविरोधात काम करणाऱ्यांवर कारवाई झालीच पाहिजे. धंगेकर आणि अब्दुल सत्तार यांच्यावर शिवसेनेने कठोर कारवाई करून युतीधर्म पाळावा. अन्यथा महायुतीच्या एकजुटीला तडा देणारे झारीतले शुक्राचार्य रोखणे गरजेचे आहे.
>
> **– नवनाथ बन, मुख्य प्रवक्ते, भाजप**

प्रवरेची वाळू लुटणारे पकडले

सात्रळमध्ये महसूल पथकाचा छापा

६.१८ लाखांचा मुद्देमाल हस्तगत

जनता आवाज वृत्तसेवा

राहुरी : तालुक्यातील सात्रळ गावच्या शिवारात प्रवरा नदीपात्रालगत सुरू असलेल्या अवैध गौण खनिज उत्खननावर महसूल विभागाच्या पथकाने धडक कारवाई केली. नालकर वस्ती परिसरात दोन स्वराज कंपनीचे ट्रॅक्टर लोखंडी यारीसह तसेच सुमारे ३० ब्रास शासकीय वाळूसाठा आढळून आला. महसूल पथकाने दोन्ही ट्रॅक्टर आणि वाळूसाठा असा एकूण ६ लाख १८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे अवैध वाळू उपशावर प्रशासनाने पुन्हा एकदा कडक कारवाईचा इशारा दिला आहे.

दि. २८ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास उपविभागीय अधिकारी विनीत शिर्के यांनी महसूल पथकाला दूरध्वनीवरून सात्रळ शिवारातील नालकर वस्ती परिसरात अवैध वाळूसाठा आणि उत्खननासाठी वापरण्यात येणारे दोन निळ्या रंगाचे स्वराज ७४४ ट्रॅक्टर लोखंडी यारीसह आढळून आल्याची माहिती दिली. कारवाईची चाहूल लागताच ट्रॅक्टरवरील चालक घटनास्थळावरून पसार झाल्याचेही सांगण्यात आले.

माहिती मिळताच महसूल व पोलीस पथकाने (पान ४ वर)

अहिल्यानगरच्या शेतकऱ्यांना १०९ कोटींचा आधार

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील : किसान सन्मानचा २४वा हप्ता जमा

जनता आवाज वृत्तसेवा

लोणी : प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा २४वा हप्ता काल, ३० ऑक्टोबर रोजी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा झाला. अहिल्यानगर जिल्ह्यातील ५ लाख ४४ हजार ७६२ शेतकऱ्यांच्या खात्यावर प्रत्येकी २ हजार रुपयांप्रमाणे एकूण १०८ कोटी ९५ लाख २४ हजार रुपये वर्ग करण्यात आले आहेत. पेरणीच्या कामांना वेग आलेला असताना मिळालेला हा निधी अल्पभूधारक व सर्वसामान्य शेतकऱ्यांसाठी दिलासादायक ठरणार असल्याचे जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सांगितले.

केंद्र सरकारने सुरू केलेली प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना शेतकऱ्यांसाठी महत्त्वपूर्ण ठरली आहे. या योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना वर्षाला ६ हजार रुपये तीन हप्त्यांमध्ये थेट बँक खात्यात जमा केले जातात. आतापर्यंत २३ हप्ते शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाले असून, आता २४वा हप्ता जमा झाल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

जिल्ह्यातील ५ लाख ४४ हजार ७६२ शेतकऱ्यांना या हप्त्याचा लाभ मिळाला असून, त्यांच्या खात्यात एकूण १०८ कोटी ९५ लाख २४ हजार रुपयांची रक्कम जमा झाली आहे. शेतीच्या विविध कामांसाठी शेतकऱ्यांना या निधीचा उपयोग होत असून, आर्थिक अडचणीच्या काळात ही मदत आधार देणारी ठरत आहे.

किसान सन्मान योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना सातत्याने आर्थिक मदत उपलब्ध करून देण्यात येत आहे. केंद्र सरकारने शेतकऱ्यांसाठी सुरू केलेल्या विविध योजनांची अंमलबजावणी सातत्याने सुरू असून, योजनांमध्ये सातत्य राखणे हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारचे यश असल्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सांगितले.

लाभार्थी शेतकऱ्यांना मिळाला दिलासा

जिल्ह्यातील लाखो शेतकऱ्यांच्या खात्यावर एकाचवेळी मोठी रक्कम वर्ग झाल्याने ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही त्याचा फायदा होणार आहे. ऐन दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना रक्कम वर्ग झाली आहे. किसान सन्मान निधीच्या माध्यमातून केंद्र सरकारकडून शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या आर्थिक मदतीचे सातत्य कायम ठेवण्यात आले असून, २४वा हप्ता जमा झाल्याने जिल्ह्यातील लाभार्थी शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

कर्जाला कंटाळून शेतकऱ्याची आत्महत्या

जनता आवाज वृत्तसेवा

पारनेर : बाभुळवाडे येथील शेतकरी दीपक शंकर खणकर (वय ५३) यांनी शेतातील राहत्या घरी आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली. अवघी दीड एकर जिरायती शेती, पावसाअभावी शेती उत्पन्नातील अनिश्चितता आणि सोसायटी, पतसंस्था तसेच खासगी स्वरूपातील सुमारे दहा लाख रुपयांच्या कर्जाचा वाढता भार, अशा आर्थिक विवंचनेतून त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलल्याची प्राथमिक माहिती आहे.

दीपक खणकर यांच्या पश्चात पत्नी आणि दोन मुले असा परिवार आहे. दीड एकर जिरायती शेती हेच त्यांच्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन होते. मात्र, पावसाच्या

अनिश्चिततेमुळे शेतीतून अपेक्षित उत्पन्न मिळत नव्हते. त्यातच कर्जाचा डोंगर वाढत गेल्याने कुटुंबावर आर्थिक संकट ओढवले होते.

खणकर यांच्यावर सोसायटी, पतसंस्था आणि खासगी स्वरूपाचे मिळून सुमारे दहा लाख रुपयांचे कर्ज असल्याचे सांगण्यात येते. कर्जाच्या रकमेबरोबरच व्याजाचा भारही वाढत होता. (पान ४ वर)

धार्मिक कार्यक्रमातून संतांच्या शिकवणीला उजाळा

आ. संग्राम जगताप; साईराम नगरातील श्री साईबाबा मंदिर सभामंडपाचे लोकार्पण

> प्रभागातील धार्मिक व सामाजिक उपक्रमांना प्रोत्साहन मिळावे, नागरिकांना मंदिर परिसरात कार्यक्रम आयोजित करता यावेत, यासाठी मंदिरांसमोर सभामंडप उभारण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. साईराम नगर येथील श्री साईबाबा मंदिरासमोरील सभामंडपाचे काम पूर्ण झाले असून, त्याचे लोकार्पण करण्यात आले. प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी आपण कटिबद्ध आहे.
>
> **– संपत बारस्कर, शहर जिल्हाध्यक्ष**

जनता आवाज वृत्तसेवा

अहिल्यानगर : महाराष्ट्राची भूमी साधुसंतांच्या पदस्पर्शाने पावन झालेली आहे. संतांनी दिलेले विचार आणि शिकवण पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन आवश्यक आहे. धार्मिक कार्याच्या माध्यमातून संतांचे विचार समाजापर्यंत पोहोचतात. त्यातून सामाजिक एकोपा अधिक दृढ होण्यास मदत होते, असे प्रतिपादन आ. संग्राम जगताप यांनी केले.

महानगरपालिका प्रभाग क्रमांक एकमधील साईराम नगर येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांच्या प्रयत्नातून श्री साईबाबा मंदिरासमोरील सभामंडपाचे काम पूर्ण करण्यात आले. या सभामंडपाचा लोकार्पण सोहळा आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते उत्साहात पार पडला. यावेळी ते बोलत होते.

संपत बारस्कर यांच्या माध्यमातून प्रभाग क्रमांक एकमध्ये विविध विकासकामे मार्गी लावण्यात आली आहेत. मूलभूत सुविधांसह कायमस्वरूपी स्वरूपाची विकासकामे करण्यावर भर दिला जात आहे. नागरिकांच्या गरजा लक्षात घेऊन नियोजनबद्ध पद्धतीने विकासकामे पूर्ण केली जात असल्याचे जगताप यांनी सांगितले.

शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर म्हणाले, सावेडी उपनगरातील प्रभाग क्रमांक एक हा झपाट्याने विकसित होत असलेला भाग आहे. त्यामुळे येथे मूलभूत सुविधांबरोबरच विविध विकासकामांची आवश्यकता आहे. आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध झाल्याने प्रभागातील अनेक कामांना गती मिळाली आहे.

विकासकामांसोबतच पर्यावरणाचे संतुलन राखणेही महत्त्वाचे आहे. नागरिकांनी पुढाकार घेऊन वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धनाची लोकचळवळ उभी करावी, असे आवाहन बारस्कर यांनी केले.

या कार्यक्रमास उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, बाळासाहेब देवकर, विजय व्यवहारे, सुरेश जेजुरकर, महेश तारडे, अनिल खंडागळे, राजेंद्र उगले, प्रशांत पाटील, नवनाथ ठोंबरे, राजेंद्र डाके, मारुती आठरे, बाळासाहेब वाळके, सुनील डोंगरे, वसंत कारंडे, वेणू बुरा, दत्तात्रय गायकवाड, अक्षय वाघमारे, आनंद धबडगावकर, बाबासाहेब शिंदे, जगन्नाथ मिसाळ यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बॅटरीत साठवली १००० मेगावॅट अवर वीज

राज्यातील ५० ठिकाणी बॅटरी साठवणूक प्रकल्प

जनता आवाज वृत्तसेवा

अहिल्यानगर : मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत निर्माण होणारी अतिरिक्त सौरऊर्जा तसेच ग्रीडद्वारे उपलब्ध होणारी स्वस्त सौरऊर्जा बॅटरीमध्ये साठवून सायंकाळच्या उच्चांकी वीज मागणीच्या काळात वापरण्याच्या महावितरणच्या उपक्रमाने महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. महावितरणने १००० मेगावॅट अवर क्षमतेची बॅटरी साठवणूक व्यवस्था कार्यान्वित केली असून, विकेंद्रित पद्धतीने एवढ्या मोठ्या प्रमाणावर बॅटरीचा वापर करून वीजपुरवठा करणारी देशातील पहिली वीज वितरण कंपनी ठरली आहे.

मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव तथा महावितरणचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी ही माहिती दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने राज्यात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० राबविण्यात येत असून, आतापर्यंत सुमारे ७ हजार मेगावॅट क्षमतेचे विकेंद्रित सौरऊर्जा प्रकल्प सुरू झाले आहेत. या प्रकल्पांतून निर्माण होणारी वीज प्रामुख्याने कृषीपंपांसाठी वापरली जाते. अतिरिक्त वीज साठवून ती सायंकाळी मागणीच्या वेळी वापरण्यासाठी बॅटरी साठवणूक यंत्रणेचा उपयोग केला जात आहे.

महावितरणने सुरू केलेल्या बॅटरी ऊर्जा साठवणूक व्यवस्थेअंतर्गत सध्या ५०० मेगावॅट क्षमतेची बॅटरी साठवणूक क्षमता कार्यान्वित झाली आहे. या बॅटरीमधून दोन तास वीजपुरवठा करता येत असल्याने एकूण १००० मेगावॅट अवर वीज साठवणूक क्षमता उपलब्ध झाली आहे. त्यामुळे सायंकाळी सौरऊर्जा निर्मिती कमी झाल्यानंतर वाढणाऱ्या वीज मागणीच्या काळात महावितरणला मोठा आधार मिळत आहे.

५० ठिकाणी १० मेगावॅटचे प्रकल्प

महावितरणने राज्यातील ५० ठिकाणी प्रत्येकी १० मेगावॅट क्षमतेचे बॅटरी साठवणूक प्रकल्प सुरू केले आहेत. विकेंद्रित वीज वितरण जाळ्याशी जोडलेल्या बॅटरी साठवणूक प्रकल्पांमुळे नवीकरणीय ऊर्जेचा अधिक कार्यक्षम वापर शक्य झाला आहे. दिवसा उपलब्ध होणारी अतिरिक्त सौरऊर्जा साठवून ती वीज मागणी वाढलेल्या काळात वापरता येत असल्याने भविष्यातील वीज व्यवस्थापनासाठी हा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

१४२ शाखांमधून अंकम उत्कृष्ट शाखाधिकारी

जनता आवाज वृत्तसेवा

अहिल्यानगर : श्री रेणुकामाता मल्टीस्टेट को-ऑप. सोसायटी लिमिटेड, अहिल्यानगरच्या ९ राज्यांतील १४२ शाखांमधून उत्कृष्ट कामगिरी करणारे शाखाधिकारी म्हणून दत्तात्रय अंकम यांची निवड करण्यात आली. वार्षिक अधिकारी व कर्मचारी गुणगौरव सोहळ्यात सिनेअभिनेते पंढरीनाथ कांबळे यांच्या हस्ते त्यांना प्रथम क्रमांकाचा उत्कृष्ट शाखाधिकारी पुरस्कार प्रदान करण्यात आला.

दत्तात्रय अंकम यांनी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. प्रशांत भालेराव यांच्या मार्गदर्शनाचे आणि प्रोत्साहनाचे विशेष कौतुक केले. डॉ. भालेराव हे अधिकारी व कर्मचाऱ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन, प्रोत्साहन आणि प्रशिक्षण देत असल्याने कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेत वाढ झाली आहे. त्यातून ग्राहकांना दर्जेदार सेवा देऊन त्यांचा विश्वास संपादन करण्यात यश मिळत असल्याचे अंकम यांनी सांगितले.

प्रेरणादायी आणि शिस्तबद्ध वातावरण असलेल्या संस्थेत काम करण्याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. यापुढील काळातही कामाची गती आणि गुणवत्ता वाढवून श्री रेणुकामाता मल्टीस्टेटच्या प्रगतीत अधिकाधिक योगदान देण्याचा प्रयत्न राहील, अशी ग्वाही अंकम यांनी दिली.

या गुणगौरव सोहळ्यास माजी आ. बाळासाहेब मुरकुटे, माजी महापौर भाऊसाहेब फुलसौंदर, माजी नगराध्यक्ष सुभाष घोडके, सरपंच भिवाजी आघाव, माजी प्राचार्य चंद्रकांत गलगट्टे, आदिनाथ महाराज शास्त्री, मंगल भालेराव, अनिरुद्ध देवचक्के, ॲड. नितीन भालेराव आदी उपस्थित होते.

बिरोबा देवस्थानच्या होईकात दुष्काळाचे संकेत

जनता आवाज वृत्तसेवा

अहिल्यानगर : नगर तालुक्यातील निमगाव वाघा येथील प्रसिद्ध बिरोबा देवस्थान येथे पारंपरिक धार्मिक प्रथेनुसार होईक सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी देवाचे भगत नामदेव भुसारे यांनी आगामी काळातील पाऊस, शेती, पशुधन तसेच भूगर्भातील जलसाठ्यांबाबत पारंपरिक भाकीत मांडले. काळी आईची वाफ होईल, असा उल्लेख करत आगामी काळात दुष्काळाची तीव्रता कायम राहण्याचे आणि जमिनीतील पाणीसाठे कमी होण्याचे संकेत देण्यात आले.

आगामी काळात पाच ते सात खंडांमध्ये परिस्थिती कठीण होण्याचे भाकीतही यावेळी करण्यात आले. तीन खंडांत आभाळ फिरेल; मात्र काही भागांत पाऊस होईल, तर काही ठिकाणी पावसाची प्रतीक्षा कायम राहील, असे पारंपरिक भाकीत सांगण्यात आले. त्यामुळे पेरणी, पिकांची वाढ आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेबाबत चिंता व्यक्त करण्यात आली.

शेती आणि पशुधनालाही आगामी काळात संकटांचा सामना करावा लागू शकतो, असे होईकातून सांगण्यात आले. लक्ष्मीचा उल्लेख करत पशुधन आणि शेतीशी संबंधित परिस्थितीकडे लक्ष वेधण्यात आले. पावसाचे अनियमित स्वरूप कायम राहिल्यास शेतकऱ्यांच्या अडचणी वाढू शकतात, असा अर्थ या पारंपरिक भाकितातून व्यक्त करण्यात आला.

ज्वारीची पेरणी होण्याचे संकेत देतानाच मुगाच्या पेरणीचा मार्ग कठीण राहील, असेही सांगण्यात आले. दिवाळीच्या सुमारास तसेच पुढील काही कालखंडांत काही भागांत पाऊस होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली.

या सोहळ्याच्या आयोजनासाठी नाना डोंगरे, नामदेव जाधव, बाबासाहेब जाधव, गोकुळ जाधव, साहेबराव बोडखे, बबन कापसे, बाबा जाधव, बाबा पुंड, अंशाबापू शिंदे, संजय डोंगरे, संजय कापसे, ठकाराम शिंदे, बाळू भुसारे, युवराज भुसारे, पांडुरंग गुंजाळ, राजू भुसारे, अंबादास निकम, कचरू कापसे, भागचंद जाधव, विजय भुसारे, रामदास वाखारे, गुलाब जाधव, गणेश भुसारे, सुरेश जाधव, अण्णा जाधव, नवनाथ जाधव, अतुल फलके, राजेंद्र डोंगरे, अरुण कापसे, रावसाहेब भुसारे आदींनी सहभाग घेतला.

जलजीवनच्या कामांचा अहवाल द्या

मुख्य कार्यकारी अधिकारी भंडारी यांचा इशारा; सरपंच-ग्रामस्थांसमक्ष पाहणीचे आदेश

जनता आवाज वृत्तसेवा

कर्जत : केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी जलजीवन योजनेच्या माध्यमातून प्रत्येक घरापर्यंत शुद्ध पिण्याचे पाणी पोहोचविण्याचे उद्दिष्ट असताना कर्जत तालुक्यात या योजनेच्या कामांबाबत गंभीर तक्रारी समोर आल्या आहेत. काही ठिकाणी निकृष्ट दर्जाची कामे, अपूर्ण योजना, पाणीपुरवठ्यातील अडचणी तसेच कामांवर अधिकाऱ्यांचे अपुरे नियंत्रण असल्याच्या तक्रारी ग्रामस्थांनी केल्या. या तक्रारींची गंभीर दखल घेत अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी, जलजीवन योजनेच्या कामात गैरव्यवहार आढळल्यास संबंधित ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्याबरोबरच त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा दिला.

कर्जत पंचायत समितीच्या सभागृहात जलजीवन योजनेच्या कामांचा आढावा घेण्यात आला. यावेळी भंडारी बोलत होते. बैठकीस गटविकास अधिकारी अजिंक्य सूर्यवंशी यांच्यासह संबंधित अधिकारी, अभियंते, सरपंच, ग्रामसेवक, पदाधिकारी आणि विविध गावांतील ग्रामस्थ उपस्थित होते.

बैठकीत विविध गावांतील नागरिकांनी जलजीवन योजनेच्या कामांबाबत तक्रारींचा पाढाच वाचला. कुठे कामांचा दर्जा निकृष्ट असल्याची तक्रार होती, तर कुठे योजना अपूर्ण राहिल्याने नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत असल्याचे सांगण्यात आले. काही ठिकाणी पाणीपुरवठा सुरू नसल्याने योजनेच्या उद्देशावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

ग्रामस्थांच्या तक्रारी ऐकल्यानंतर भंडारी यांनी संबंधित अधिकाऱ्यांना केवळ कार्यालयीन नोंदीवर अवलंबून न राहता प्रत्यक्ष गावांमध्ये जाऊन कामांची पाहणी करण्याचे आदेश दिले. सरपंच, ग्रामस्थ आणि संबंधित ठेकेदार यांच्या उपस्थितीत कामाची पाहणी करून वस्तुस्थितीचा सत्य अहवाल सादर करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. बैठकीत मांडण्यात आलेल्या तक्रारींची दखल घेत आनंद भंडारी यांनी प्रत्येक तक्रारग्रस्त गावात संबंधित अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी करावी, असे आदेश दिले. सरपंच, ग्रामस्थ आणि ठेकेदार यांच्या उपस्थितीत कामाची तपासणी करून त्याचा सत्य अहवाल सादर करावा, असे त्यांनी स्पष्ट केले.

सेवाभावातून फराळाची मेजवानी

भगवान महावीर भवनात फराळ महोत्सवाचा प्रारंभ

जनता आवाज वृत्तसेवा

अहिल्यानगर : सर्वसामान्यांपासून श्रीमंत कुटुंबांपर्यंत प्रत्येकाला दिवाळीच्या फराळाचा आनंद घेता यावा, या उद्देशाने जैन सोशल फेडरेशन संचलित स्टेशन रोड येथील भगवान महावीर भवनात सलग १४ व्या वर्षी दिवाळी फराळ महोत्सवाला सुरुवात झाली. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन झाले. महागाई आणि दुष्काळाचे सावट असतानाही ना नफा, ना तोटा या तत्त्वावर स्वच्छ, आरोग्यदायी वातावरणात तयार केलेला दर्जेदार फराळ नागरिकांना माफक दरात उपलब्ध करून देण्यात आला आहे.

उद्घाटनप्रसंगी बडी साजन ओसवाल श्री संघाचे अध्यक्ष पेमराज बोथरा, सतीश लोढा, संतोष बोथरा, डॉ. विजय भंडारी, डॉ. प्रकाश कांकरिया, सुनील मालू, आनंदऋषीजी नेत्रालयाचे प्रशासकीय अधिकारी आनंद छाजेड, माणकचंद कटारिया, सतीश मुनोत, गिरीश गांधी, मिलापचंद पटवा, प्रकाश पटवा, अमित पटवा, रुपेश पटवा, आर्यन पटवा आदी उपस्थित होते.

बुंदीचे लाडू, मसाला शेव, चिवडा, शंकरपाळे, सोनपापडी यांसह विविध प्रकारचे दिवाळी फराळ नागरिकांना परवडणाऱ्या दरात उपलब्ध करून देण्यात आले आहेत. उच्च प्रतीचा कच्चा माल वापरून स्वच्छ व आरोग्यदायी वातावरणात फराळ तयार करण्यात येत आहे. शहरासह जिल्ह्याच्या विविध भागांतून या फराळाला मागणी मिळत असल्याचे आयोजकांनी सांगितले.

'कमी पाण्यात जैविक शेतीचा अवलंब करा'

जनता आवाज वृत्तसेवा

गुहा : येणारा काळ शेतीसाठी आव्हानात्मक असणार आहे. बदलते हवामान, पाणीटंचाई आणि वाढता उत्पादन खर्च यामुळे शेतकऱ्यांसमोरील अडचणी वाढत आहेत. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी कमी क्षेत्रात, कमी पाण्यात जैविक व काटेकोर शेती करण्याबरोबरच शेती खर्चात बचत करावी. नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादन वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांनी केले.

राहुरी तालुक्यातील गुहा येथे संत सावता माळी शेतकरी गटाच्या वतीने बुधवारी (२८ ऑक्टोबर) जलव्यवस्थापन व चारा पिके या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ. खर्चे बोलत होते. कार्यक्रमास राहुरी तालुका कृषी अधिकारी बापूसाहेब शिंदे, डॉ. उलाल, डॉ. विजयकुमार शिंदे, डॉ. शाळीग्राम गांगुर्डे, डॉ. व्ही. एस. पाटील, प्रा. चिमाजी बाचकर आदी उपस्थित होते.

डॉ. विलास खर्चे म्हणाले, शेतकरी गटांच्या माध्यमातून सामूहिक प्रयत्न केल्यास शेती क्षेत्रात मोठा बदल घडवून आणता येऊ शकतो. पाणी फाउंडेशनच्या माध्यमातून जलसंधारण व शेती क्षेत्रात चांगले काम सुरू आहे. कृषी विद्यापीठामार्फत कीड व्यवस्थापन, खते, बियाणे आणि विविध निविष्ठांची निर्मिती करून त्याचा लाभ शेतकऱ्यांना मिळवून देण्यात येत आहे.

फळबागा वाचविण्यासाठी ठिबक व तुषार सिंचनाचा वापर करावा. पाण्याचे बाष्पीभवन कमी करण्यासाठी आच्छादनाचा वापर करावा तसेच तणनियंत्रणावर भर द्यावा. दुष्काळी परिस्थितीत कृषी विभाग शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहील, असे शिंदे यांनी सांगितले. कार्यक्रमास पाणी फाउंडेशनचे विभागीय समन्वयक विक्रम फाटक, राहुरी आत्माचे तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक सुजित गायकवाड, उमेद फाउंडेशनचे तालुका व्यवस्थापक मिलिंद आडसुरे, संतोष कवणे, मंडळ कृषी अधिकारी भारत कातोरे, कृषी अधिकारी अतुल काळे, गुहा येथील कृषी अधिकारी काशिनाथ आडभाई यांच्यासह तालुक्यातील शेतकरी, महिला बचत गटांचे सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

किक बॉक्सिंगमध्ये जिल्ह्याच्या खेळाडूंचा नावलौकिक

जिल्हा क्रीडा अधिकारी खुरांगे; मिशन लक्षवेध अंतर्गत पाच खेळांची प्रशिक्षण केंद्रे

> किक बॉक्सिंग आता ग्रामीण भागापर्यंत पोहोचले आहे. त्यामुळे जिल्हास्तरीय शालेय स्पर्धेत सुमारे ३०० खेळाडूंनी सहभाग घेतला आहे. शालेय स्पर्धांमुळे खेळाडूंना विविध स्तरांवरील स्पर्धांचा अनुभव मिळतो. क्रीडा क्षेत्रात करिअरच्या अनेक संधी उपलब्ध असून, शासनाच्या नोकऱ्यांमध्ये खेळाडूंसाठी पाच टक्के आरक्षणाची तरतूद आहे.
>
> **– नितीन शेलार, जिल्हाध्यक्ष**

जनता आवाज वृत्तसेवा

अहिल्यानगर : जिल्ह्यातील खेळाडूंनी विविध शालेय क्रीडा प्रकारांत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांसाठी जिल्ह्यातील १०० हून अधिक खेळाडू सहभागी झाले होते. किक बॉक्सिंगमधील खेळाडूंनीही राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर आपली ओळख निर्माण केली आहे. अहिल्यानगर जिल्हा किक बॉक्सिंग असोसिएशनचे राज्याध्यक्ष निलेश शेलार हे आंतरराष्ट्रीय स्तरावर किक बॉक्सिंगमध्ये भारताचे नेतृत्व करीत असल्याने ही जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब आहे, असे प्रतिपादन जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे यांनी केले.

महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आणि अहिल्यानगर जिल्हा किक बॉक्सिंग स्पोर्ट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय शालेय किक बॉक्सिंग स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे यांच्या हस्ते उत्साहात झाले. यावेळी ते बोलत होते.

१४, १७ आणि १९ वर्षांखालील वयोगटातील सुमारे ३०० खेळाडूंनी स्पर्धेत सहभाग घेतला. किक बॉक्सिंग या खेळाचा ग्रामीण भागातही विस्तार होत असल्याचे या मोठ्या सहभागातून स्पष्ट झाले.

महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांमध्ये क्रीडा आयोजनाच्या बाबतीत अहिल्यानगर जिल्हा प्रथम क्रमांकावर आहे. यंदा जिल्ह्यात १३ राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांसह कबड्डीच्या राष्ट्रीय स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले. २०३६ मधील ऑलिंपिक आणि २०३२ मधील राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा डोळ्यांसमोर ठेवून केंद्र व राज्य शासनाकडून खेळाडूंना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच प्रशिक्षण केंद्रांची निर्मिती केली जात आहे.

मिशन लक्षवेध अंतर्गत अहिल्यानगर जिल्ह्यात पाच खेळांची जिल्हास्तरीय प्रशिक्षण केंद्रे कार्यान्वित करण्यात येत आहेत. शालेय क्रीडा स्पर्धांमधूनच गुणवंत खेळाडू घडतात. या स्पर्धांमुळे खेळाडूंना आपले कौशल्य सिद्ध करण्याची संधी मिळते. किक बॉक्सिंगमधील खेळाडूंनी जिद्द, चिकाटी आणि सातत्याच्या जोरावर पुढील स्तरावर यश मिळवावे, असे आवाहन खुरांगे यांनी केले. उद्घाटनप्रसंगी क्रीडा अधिकारी प्रवीण कोंढावळे, सचिन मकासरे, जयेश आनंदकर, ओंकार झोडगे, माऊली जमदाडे, सचिन साळवे, प्रशांत बोऱ्हाडे, लखन शिंदे, गोकुळ सोलाट, अमोल कासार यांच्यासह खेळाडू, प्रशिक्षक आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आदिवासी चिमुकल्यांना मायेची उब!

३०० विद्यार्थ्यांना उबदार स्वेटरचे वाटप

आदिवासी सेवक प्रा. बाबा खरात म्हणाले की, सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांनी घालून दिलेले सामाजिक सेवेचे संस्कार लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी जपले आहेत. त्याच विचारांचा वारसा डॉ. जयश्रीताई थोरात पुढे नेत असून त्या गोरगरीब आणि आदिवासी समाजाच्या सेवेसाठी सातत्याने कार्यरत आहेत. या चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर फुललेले हास्य हे कोणत्याही पैशात मोजता येणार नाही. शिक्षणाच्या माध्यमातूनच आदिवासी आणि गोरगरीब समाजाची प्रगती शक्य आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळते आणि समाजात खऱ्या अर्थाने आनंद निर्माण होतो.

जनता आवाज वृत्तसेवा

संगमनेर : राजकारण हे केवळ सत्तेसाठी नसून समाजातील गोरगरीब, वंचित आणि दुर्बल घटकांच्या जीवनात आनंद निर्माण करण्याचे प्रभावी माध्यम आहे, ही लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी जपलेली सामाजिक सेवेची परंपरा डॉ. जयश्रीताई थोरात पुढे नेत आहेत. याच भावनेतून त्यांच्या पुढाकाराने एकविरा फाउंडेशन आणि बीएसटी आर्मीच्या संयुक्त विद्यमाने संगमनेर तालुक्यातील आदिवासी व मागासवर्गीय वस्त्यांमधील जिल्हा परिषद शाळांतील ३०० विद्यार्थ्यांना उबदार स्वेटरचे वाटप करण्यात आले. थंडीच्या दिवसांत या चिमुकल्यांना स्वेटरच्या माध्यमातून मायेची ऊब मिळाल्याने त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला.

संगमनेर तालुक्यातील चंदनापुरी येथील आनंदवाडी, जावळे वस्ती, ठाकरवाडी, सावरगाव तळ येथील गाडेवस्ती, सतीची वाडी, डोळासणे येथील डुबे वाडी, खैरेदरा आणि गिरेवाडी या ठिकाणी हा उपक्रम राबविण्यात आला. एकविरा फाउंडेशन व विदेशात कार्यरत असलेल्या बीएसटी आर्मीच्या सदस्यांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांना स्वेटरचे वाटप करण्यात आले.यावेळी आदिवासी सेवक प्रा. बाबा खरात, तालुकाध्यक्ष बाळकृष्ण गांडाळ, यशोधन कार्यालयातील शर्मिला हांडे, ज्योती थोरात, श्रद्धा कढणे, वंदना राहणे, उज्ज्वला राहणे, प्राजक्ता घुले, वंदना शर्माळे, हर्षल काकड यांच्यासह स्थानिक पदाधिकारी, शिक्षक, पालक व नागरिक उपस्थित होते.

माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली एकविरा फाउंडेशनच्या माध्यमातून महिला सबलीकरणासह विविध सामाजिक उपक्रम सातत्याने राबविले जातात. समाजातील वंचित घटकांना मदतीचा हात देणे, विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देणे आणि त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविणे या उद्देशाने विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते. याच सामाजिक बांधिलकीतून बीएसटी आर्मीच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात आला. नवीन स्वेटर मिळाल्यानंतर चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले हास्य आणि त्यांच्या डोळ्यांतील आनंद हा या उपक्रमाचा खरा आनंद ठरला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक शर्मिला हांडे यांनी केले, तर ज्योती थोरात यांनी उपस्थितांचे आभार मानले.

रेशन दुकानाबाबत मढी ग्रामस्थांचे उपोषण

जनता आवाज वृत्तसेवा

पाथर्डी : तालुक्यातील श्री क्षेत्र मढी येथील स्वस्त धान्य दुकानातून लाभार्थ्यांना नियमानुसार धान्य न मिळाल्याच्या गंभीर आरोपांवरून पाथर्डी तहसील कार्यालयासमोर ग्रामस्थांनी उपोषण सुरू केले. दुकानदाराचा परवाना रद्द करणे, कायदेशीर कारवाई करणे आणि धान्य वितरण दुसऱ्या दुकानदाराकडे सोपवणे, अशा मागण्यांसाठी पोपट आरोळे, बाळू साळवे, राधाकिसन मरकड, भागेश मरकड, योगेश मरकड, चंद्रभान पाखरे यांच्यासह मढीतील अनेक ग्रामस्थ या उपोषणात सहभागी झाले आहेत.

ग्रामस्थांच्या मते, दुकानात धान्य वाटपात मोठ्या प्रमाणात कपात केली जात आहे. अंत्योदय कार्डधारकांना नियमानुसार ३५ किलो धान्य मिळणे अपेक्षित असताना काहींना २५ ते ३० किलो, तर काहींना त्याहूनही कमी धान्य दिले जात असल्याचा आरोप आहे. प्रत्यक्ष तपासणीत ३५ किलोच्या पाकिटामागे केवळ २३ किलो आणि २० किलोच्या वाटपात केवळ आठ किलो धान्य मिळाल्याचे राधाकिसन मरकड यांनी सांगितले. चार सदस्य असलेल्या कुटुंबांनाही २० किलोऐवजी केवळ १५ किलो धान्य दिले जात असल्याचा आरोप बाळू साळवे यांनी केला.

पोपट आरोळे यांनी सांगितले की, सामान्य लाभार्थ्यांना २० किलोऐवजी केवळ १७ किलो धान्य दिले जात होते. पावती मागितल्यास दुकानदार नकार देत होता. दुकानाची तपासणी व झाडाझडती झाल्यानंतरच पावत्या देण्यास सुरुवात झाली. दुकान सुरू झाल्यापासूनच हा प्रकार चालू असल्याचा आरोप त्यांनी केला. तसेच दिवाळीची साडी आणि अंत्योदय योजनेअंतर्गत दरमहा मिळणारी एक किलो साखर गेल्या दोन ते चार वर्षांपासून लाभार्थ्यांना मिळाली नसल्याचेही सांगण्यात आले.

समर्थ अभियांत्रिकीत कॅम्पस ड्राइव्ह

११ विद्यार्थ्यांची झाली कंपनीत निवड

जनता आवाज वृत्तसेवा

बेल्हे : समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, बेल्हे येथे रांजणगाव एमआयडीसी मधील जपानी बहुराष्ट्रीय कंपनी, जेएफई शोजी स्टील इंडिया प्रा. लि. यांच्यातर्फे आयोजित कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्हमध्ये महाविद्यालयातील ११ विद्यार्थ्यांची निवड झाली.महाविद्यालयाच्या प्रशिक्षण व प्लेसमेंट विभागाच्या वतीने या निवड प्रक्रियेचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमामुळे अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना नामांकित औद्योगिक कंपनीत प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळविण्याची आणि करिअरची भक्कम सुरुवात करण्याची संधी उपलब्ध झाली आहे. या कॅम्पस ड्राइव्हमध्ये महाविद्यालयातील अंतिम वर्षाच्या मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल तसेच इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन या अभियांत्रिकी शाखांतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कंपनीच्या प्रतिनिधींनी विद्यार्थ्यांची तांत्रिक मुलाखत घेऊन त्यांच्या विषयज्ञानाची, तांत्रिक कौशल्यांची आणि औद्योगिक क्षेत्रात काम करण्याच्या क्षमतेची पडताळणी केली. इंटर्नशिप यशस्वीरीत्या पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना कंपनीत पूर्णवेळ कर्मचारी म्हणून सामावून घेण्याची संधी मिळणार आहे.

कंपनीचे उपमहाव्यवस्थापक संजय कुमार सूर्यवंशी, एच.आर. मॅनेजर रेश्मा येळनुरे आणि प्रज्ञा भालेराव यांचे महाविद्यालयाच्या वतीने स्वागत करण्यात आले. यावेळी सूर्यवंशी यांनी विद्यार्थ्यांना कंपनीच्या कार्यपद्धतीची माहिती देताना स्टील प्रोसेसिंग उद्योगातील आधुनिक तंत्रज्ञान, सीएनसी मशीनचे कार्य, तसेच कटिंग आणि स्लिटिंग लाईनच्या प्रक्रियेविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नवनाथ नरवडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना, रोजगाराच्या संधींचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी आत्मविश्वास, तांत्रिक ज्ञान आणि व्यावसायिक दृष्टिकोन विकसित करणे आवश्यक असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभारप्रदर्शन महाविद्यालयाचे प्रशिक्षण व प्लेसमेंट अधिकारी प्रा. सचिन पोखरकर यांनी केले. यावेळी संस्थेचे प्रशासकीय अधिकारी प्रा. प्रदीप गाडेकर, विभागप्रमुख प्रा. निलेश नागरे, प्रा. निर्मल कोठारी तसेच महाविद्यालयातील प्राध्यापकवर्ग उपस्थित होता.

हरित दुरगावच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल!

घनकचरा व्यवस्थापन कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद

जनता आवाज वृत्तसेवा

कर्जत : तालुक्यातील दूरगाव येथे स्वच्छ, सुंदर आणि पर्यावरणपूरक गाव निर्माण करण्यासाठी लोकसहभाग महत्त्वाचा असून कचऱ्याचे शास्त्रशुद्ध व्यवस्थापन ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र देसले यांनी केले. दुरगाव (ता. कर्जत) येथे घनकचरा व्यवस्थापन अधिनियम २०२६ अंतर्गत आयोजित विशेष कार्यशाळेत ते बोलत होते. या कार्यशाळेला ग्रामस्थ, विद्यार्थी, शिक्षक आणि विविध विभागांच्या कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, दुरगाव येथे आयोजित या कार्यशाळेच्या प्रारंभी गावातून जनजागृती फेरी काढण्यात आली. ओला व सुका कचरा वेगवेगळा करणे, कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणे आणि सार्वजनिक स्वच्छता राखण्याचा संदेश या फेरीतून देण्यात आला. विद्यार्थ्यांनी टाकाऊ वस्तूंपासून टिकाऊ व उपयुक्त वस्तू तयार करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. यावेळी जिल्हा समन्वयक ठुबे मॅडम, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. राजेंद्र सांगळे, विस्तार अधिकारी परमेश्वर सुद्रिक, कराळे साहेब, शिक्षण विस्तार अधिकारी गायकवाड मॅडम, रमेश सुपेकर, बजरंग गोडसे, माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक निकत आणि जनक वाघमारे, अशोक जायभाय यांच्यासह सरपंच आजिनाथ जायभाय, उपसरपंच पप्पू शेख, ग्रामसेवक नवनाथ गायकवाड, अशोक जायभाय, गणेश निंबाळकर उपस्थित होते.

देसले यांनी दुरगाव ग्रामस्थांच्या एकजुटीचे आणि उपक्रमशीलतेचे कौतुक केले. गावाच्या विकासासाठी जिल्हा परिषदेचे पूर्ण सहकार्य राहील. दुरगाव भविष्यात जिल्हा, विभाग आणि राज्य स्तरावर नावारूपाला येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. गावाचा विकास आराखडा समजून घेतला असून गावाला योग्य न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जातील, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

उंदिरगावात अस्वच्छतेचे साम्राज्य

ग्रामपंचायत प्रशासन झोपले आहे का?

जनता आवाज वृत्तसेवा

श्रीरामपूर : तालुक्यातील उंदिरगावात सध्या अस्वच्छतेचा प्रश्न गंभीर बनत असून, संपूर्ण गावात ठिकठिकाणी कचरा, प्लास्टिकच्या कॅरीबॅग आणि अस्वच्छतेचे चित्र दिसत असल्याच्या तक्रारी पुढे येत आहेत. कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावली जात नसल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. गावात अनेक ठिकाणी कचरा साचत असल्याने काही ठिकाणी कॅरीबॅग व प्लास्टिक जाळले जात असल्याच्या तक्रारी आहेत. प्लास्टिक जाळल्यामुळे निर्माण होणारा धूर नागरिकांच्या आरोग्यासाठी घातक ठरू शकतो. दुसरीकडे, कचरा संकलनासाठी असलेली घंटागाडी उपलब्ध असूनही तिचा नियमित उपयोग झाला नाही आणि ती गंजून पडल्याचे सांगण्यात येत आहे. मग सार्वजनिक निधीतून घेतलेल्या गाडीचा प्रश्न नागरिक विचारत आहेत. गावातील प्रत्येक घरातून कचरा संकलन करणे, ओला व सुका कचरा वेगळा करणे आणि त्याची योग्य विल्हेवाट लावणे ही ग्रामपंचायत प्रशासनाची महत्त्वाची जबाबदारी आहे. मात्र, घंटागाडीचा प्रभावी वापर होत नसेल, कचरा वेळेवर उचलला जात नसेल आणि गटारींची नियमित साफसफाई होत नसेल, तर गाव स्वच्छ कसे राहणार? हा प्रश्न अनुत्तरित आहे.

डेंग्यू-मलेरियाच्या धोक्याकडे दुर्लक्ष?

साचलेले पाणी, अस्वच्छ परिसर आणि डासांची उत्पत्ती यामुळे डेंग्यू, मलेरिया यांसारख्या आजारांचा धोका वाढू शकतो. गावात रुग्ण वाढत असल्याच्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर स्वच्छता, फवारणी, गटारसफाई आणि डास नियंत्रणासाठी प्रशासनाने तातडीने उपाययोजना करणे गरजेचे आहे. रुग्णसंख्येची अधिकृत आकडेवारी उपलब्ध झाल्यास या परिस्थितीची गंभीरता अधिक स्पष्ट होईल.

फटाक्यांना फाटा, पर्यावरणपूरक दिवाळीचा जागर!

दादा पाटीलच्या विद्यार्थ्यांचे कर्जत शहरात जनप्रबोधन

जनता आवाज वृत्तसेवा

कर्जत : फटाक्यांचा धूर नको, पर्यावरणाचा आनंद हवा, असा संदेश देत दादा पाटील महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्याच्या माध्यमातून कर्जत शहरात पर्यावरणपूरक दिवाळीचा जागर केला. चला साजरी करूया प्रदूषणमुक्त दिवाळी या पथनाट्याद्वारे नागरिकांमध्ये पर्यावरण संवर्धन आणि प्रदूषणमुक्त सण साजरा करण्याबाबत जनजागृती करण्यात आली.

दादा पाटील महाविद्यालयाच्या पर्यावरण जनजागृती विभाग, सांस्कृतिक विभाग आणि वर्ल्ड डिजिटल डिटॉक्स डे, झेप फाऊंडेशन, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला. कर्जत शहरातील एसटी बसस्थानक, बाजारतळ, मुख्य रस्ते तसेच विविध विद्यालयांच्या परिसरात विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर केले.

फटाकेमुक्त दिवाळी अभियान, झाडे लावा, झाडे जगवा, प्रदूषण टाळा, पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करा अशा घोषणांमधून विद्यार्थ्यांनी नागरिकांचे लक्ष वेधले. विषारी फटाक्यांमुळे होणारे वायुप्रदूषण, श्वसनाचे आजार, दमा, अंधत्व व बहिरेपणाचा धोका तसेच वृद्धांना होणारा त्रास यांचे प्रभावी चित्रण पथनाट्यातून करण्यात आले. यासोबतच मुलगी वाचवा या सामाजिक विषयाचाही समावेश करण्यात आला.

प्राचार्य डॉ. संजय नगरकर यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. सांस्कृतिक विभागाचे डॉ. प्रमोद परदेशी यांच्या सहकार्याने प्रा. स्वप्नील म्हस्के आणि पर्यावरण जनजागृती विभागाचे प्रा. वैभव वरुडळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

गौरव धांडे, राहुल भोसले, चैतन्य शेटे, रुपेश गायकवाड, अनुष्का कदम, साक्षी खाटमोडे आणि साक्षी काळे यांनी पथनाट्यात सहभाग घेतला. प्रकाश शिंदे यांनी संहिता लेखनात सहकार्य केले. प्रा. अनुपम शिवरकर, प्रा. उमेश शिंदे, कुणाल नेटके आणि दिग्विजय रानमाळ यांनीही योगदान दिले.

पारनेरमध्ये आज पथसंचलनाचे आयोजन

जनता आवाज वृत्तसेवा

पारनेर : राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, पारनेर तालुक्याच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही विजयादशमी उत्सव, शस्त्रपूजन व भव्य पथसंचलनाचे आयोजन आज शनिवार, दि. ३१ रोजी करण्यात आले आहे. या उत्सवाच्या माध्यमातून हिंदू संस्कृती, शौर्य, पराक्रम, त्याग आणि सामाजिक एकात्मतेचा संदेश दिला जाणार असून पारनेर शहरात उत्साहपूर्ण वातावरणात हा कार्यक्रम पार पडणार आहे. सकाळी ९.२० वाजेपर्यंत पारनेर येथील नागेश्वर मंदिर प्रांगणात स्वयंसेवकांचे एकत्रीकरण होणार आहे. त्यानंतर सकाळी १० वाजता शस्त्रपूजन व संचलनाला सुरुवात होणार आहे. या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा प्रचारक दीपक पारेकर उपस्थित राहणार असून ते स्वयंसेवकांना मार्गदर्शन करणार आहेत. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून भागवत कथाकार, कीर्तनकार, प्रवचनकार, प्रखर हिंदुत्ववादी आणि सामाजिक कार्यकर्ते ह.भ.प. सचिन महाराज शेटे यांची उपस्थिती लाभणार आहे. या संचलनामध्ये पारनेर तालुक्यातील सर्व स्वयंसेवकांनी संपूर्ण गणवेशात उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. तसेच पारनेर शहर व तालुक्यातील हिंदू समाजातील बंधू-भगिनी आणि नागरिकांनीही या उत्सवाला उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे निमंत्रण देण्यात आले आहे.

असा असेल संचलनाचा मार्ग ,

नागेश्वर मंदिर प्रांगण येथून संचलनाला सुरुवात होऊन डॉ. पठारे हॉस्पिटल चौक, खालची वेस, हनुमान मंदिर, मुख्य बाजारपेठ, भैरवनाथ मंदिर, कोमल किराणा स्टोअर्स, पारनेर कोर्ट, तहसील कार्यालय रोड, हिंद चौक, नागेश्वर कमानीतून पुन्हा नागेश्वर मंदिर प्रांगण येथे संचलनाची सांगता होणार आहे.

सेतू केंद्रांच्या मनमानी कारभाराला लगाम घाला!

सर्व सेतू केंद्रांना जिओ-लोकेशन बंधनकारक करा

जता आवाज वृत्तसेवा

साकुरी : अहिल्यानगर जिल्ह्यातील काही सेतू केंद्र चालक आपले अधिकृत लॉगिन आयडी व पासवर्ड सायबर कॅफे चालकांना किंवा अन्य व्यक्तींना भाडेतत्त्वावर वापरण्यास देत असल्याच्या तक्रारींची चौकशी करून अशा प्रकारांना आळा घालावा, अशी मागणी अधिकृत सेतू केंद्र चालकांकडून करण्यात येत आहे. जिल्ह्यातील सर्व सेतू केंद्रांना जिओ-लोकेशन बंधनकारक करून मंजूर ठिकाणापासून केवळ एक किलोमीटरच्या परिसरातच कामकाज करण्याची व्यवस्था लागू करावी, अशी मागणी जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

शासनाच्या विविध योजनांचे दाखले, उत्पन्नाचा दाखला, रहिवासी दाखला, जात प्रमाणपत्र तसेच इतर ऑनलाइन शासकीय सेवांसाठी नागरिक अधिकृत सेतू केंद्रांवर अवलंबून असतात. सेतू केंद्र सुरू करण्यासाठी संबंधित चालकांना कार्यालय, संगणक, इंटरनेट, वीज, कर्मचारी आणि इतर सुविधांवर खर्च करावा लागतो. मात्र, काही ठिकाणी अधिकृत सेतू केंद्राच्या नावाखाली इतर ठिकाणांहून अर्ज भरण्याचे काम होत असल्यास, नियमांचे पालन करून व्यवसाय करणाऱ्या अधिकृत सेतू चालकांवर अन्याय होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

सेतू केंद्रांचे लॉगिन आयडी आणि पासवर्ड इतर व्यक्तींना वापरण्यास दिले जात असल्याच्या तक्रारींची प्रशासनाने गांभीर्याने दखल घ्यावी. अशा प्रकारांमुळे शासकीय ऑनलाइन प्रणालीच्या सुरक्षिततेचा, अर्जदारांच्या वैयक्तिक कागदपत्रांच्या गोपनीयतेचा आणि संबंधित व्यवहारांच्या जबाबदारीचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व सेतू केंद्रांची प्रत्यक्ष तपासणी करून मंजूर पत्ता आणि प्रत्यक्ष कामकाजाचे ठिकाण यांची पडताळणी करावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

लोकेशनद्वारे कामकाजावर नियंत्रण ठेवा

जिल्ह्यातील सर्व अधिकृत सेतू केंद्रांना जिओ-लोकेशन प्रणालीशी जोडण्यात यावे. संबंधित पोर्टलवर लॉगिन करताना नोंदणीकृत केंद्राचे लोकेशन पडताळण्याची तांत्रिक सुविधा उपलब्ध करून द्यावी. मंजूर ठिकाणापासून एक किलोमीटरच्या परिसरातच सेतू सेवा चालविण्याबाबत सक्षम प्राधिकरणाने नियम निश्चित करावेत. तसेच अनधिकृत ठिकाणांहून कामकाज होत असल्याचे आढळल्यास संबंधित नियमांनुसार कारवाई करावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

संदीप गडाख यांना पीएच.डी. प्रदान

जनता आवाज वृत्तसेवा

श्रीरामपूर : श्रीरामपूर शहरातील मोरगे वस्ती येथे स्थायिक असलेले संशोधक संदीप वसंतराव गडाख यांना मुंबई विद्यापीठाकडून घेण्यात आलेल्या रसायनशास्त्र विषयात विशेष प्राविण्य मिळवून मुंबई विद्यापीठाकडून रसायनशास्त्र विषयात पीएच.डी. पदवी संपादन केली आहे त्यांच्या या यशाबद्दल शैक्षणिक औद्योगिक व सामाजिक क्षेत्रातून अभिनंदन होत आहे. संदीप गडाख यांनी "डिझाईन अँड सिंथेसिस ऑफ बायोॲक्टिव्ह हेटरोसायक्लिक कंपाऊंड्स अँड देअर इम्पॉर्टन्स इन मेडिसिनल केमिस्ट्री." या विषयावर आपला प्रबंध विद्यापीठात सादर केला. त्यात त्यांनी कठोर परिश्रम घेत यश मिळवले असून त्यांना पनवेल येथील चांगू काना ठाकूर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. बाळासाहेब आघाव यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या या यशाबद्दल प्राचार्य प्रा. डॉ. एस. के. पाटील आणि रसायनशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. बी. व्ही. जाधव यांनी त्यांचे विशेष अभिनंदन केले

डॉ. गुंजाळ यांना पीएचडी प्रदान

जनता आवाज वृत्तसेवा

संगमनेर : शहराला लागत असणाऱ्या गुंजाळ नगर येथील डॉ. प्रवीण काशिनाथ गुंजाळ यांना मध्यप्रदेश राज्यातील विक्रांत विद्यापीठाच्या वतीने पीएच. डी. पदवी प्रदान करण्यात आली. डॉ. प्रवीण काशीनाथ गुंजाळ यांनी वाढत्या शहरी तापमानावर नियंत्रण मिळविण्यासाठी 'अर्बन हीट आयलंड इफेक्ट' कमी करण्याच्या दृष्टीने काचेची पावडर व झिओलाइटचा वापर करून पर्यावरणपूरक आणि शाश्वत बांधकाम साहित्य विकसित करण्यावर संशोधन केले. या त्यांच्या संशोधनाची विक्रांत विद्यापीठाने दखल घेऊन त्यांना पीएचडी प्रदान केली आहे त्यांच्या यशाबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

संपादकीय

पावसाळ्याचा निरोप

यंदाच्या मोसमी पावसाने आपला मुक्काम आटोपता घेत माघारीची दिशा पकडली आहे. पुणे वेधशाळा आणि भारतीय हवामान विभागाने दिलेल्या अधिकृत माहितीनुसार महाराष्ट्रातील जवळपास निम्म्या प्रदेशातून मॉन्सूनने अधिकृतपणे माघार घेतली आहे. विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्राच्या मोठ्या पट्ट्यातून पावसाचे सावट दूर झाले असून, निळेशार, स्वच्छ आणि निरभ्र आकाश पसरू लागले आहे. वातावरणातील गारवा आणि ढगांची सावली ओसरून दुपारच्या वेळी अंगाची लाही लाही करणारी उष्णता वाढू लागली आहे. हा केवळ एका पावसाचा निरोप नाही, तर एका संपूर्ण ऋतूचे दुसऱ्या ऋतूमध्ये होणारे गतिमान संक्रमण आहे. सामान्य माणसाला पाऊस थांबणे किंवा ऊन पडणे ही एक साधी गोष्ट वाटू शकते; परंतु हवामानशास्त्राच्या दृष्टीने मान्सूनचा परतीचा प्रवास ही प्रचंड गुंतागुंतीची आणि वेध घेण्याजोगी खगोलीय व वातावरणीय प्रक्रिया आहे. पावसाच्या माघारीची रेषा महाराष्ट्राच्या मधोमध येऊन ठेपली आहे. पोषक कोरडे वातावरण आणि उच्च दाबाचा पट्टा कायम राहिल्याने पुढील दोन ते तीन दिवसांमध्ये विदर्भाचा उर्वरित भाग, मराठवाड्याचा बहुतांश परिसर, मध्य महाराष्ट्राचा उर्वरित भाग तसेच शेजारील तेलंगण आणि उत्तर कर्नाटकमधूनही मोसमी वारे पूर्णपणे परतण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. चार महिन्यांच्या प्रदीर्घ वास्तव्यानंतर मोसमी वाऱ्यांचे हे जलद प्रयाण हवामानातील मोठ्या स्थित्यंतराची साक्ष देते. महाराष्ट्रासारख्या शेतीप्रधान राज्यासाठी मॉन्सूनचा परतीचा टप्पा हा नेहमीच दुधारी तलवारीसारखा असतो. सध्या राज्यातील शेतकरी खरीप पिकांच्या सुगीच्या तयारीत व्यस्त आहे. सोयाबीन, उडीद, मूग ही पिके कापणीला आली असून अनेक ठिकाणी मळणीची कामे सुरू आहेत; तर दुसरीकडे कपाशी, तूर आणि बाजरीची पिके निर्णायक टप्प्यात उभी आहेत. अशा वेळी पावसाने उघडीप देणे आणि कडक ऊन पडणे हे खरिपाच्या काढणीसाठी अत्यंत फायदेशीर ठरते. उघडीप मिळाल्याने शेतातील काढणीची कामे निर्विघ्न पार पडू शकतात, धान्याला बुरशी लागण्याचा धोका टळतो आणि शेतमालाची प्रत टिकून राहण्यास मदत होते; परंतु या चित्राला दुसरी आणि गंभीर बाजूही आहे. महाराष्ट्रातील कोरडवाहू शेती ही मोठ्या प्रमाणावर पावसाने जमिनीत सोडलेल्या ओलाव्यावर अवलंबून असते. आगामी रब्बी हंगामात हरभरा, रब्बी ज्वारी, गहू आणि तेलबियांची पेरणी करायची असेल, तर जमिनीच्या थरामध्ये पुरेशी ओल शिल्लक राहणे अनिवार्य असते. ऑक्टोबर हिटच्या तीव्र चटक्यांमुळे ही ओल वेगाने उडून गेली, तर रब्बीच्या पेरण्या अडचणीत येऊ शकतात. त्यामुळे एकीकडे खरिपाचे पीक सुरक्षितपणे घरात आणतानाच, दुसरीकडे रब्बीसाठी उपलब्ध ओलाव्याचा पुरेपूर वापर करण्याचे मोठे आव्हान बळीराजासमोर उभे ठाकले आहे. यंदाच्या पावसाने राज्याला सर्वसाधारणपणे दिलासा दिला असला, तरी अनेक धरणांमधील पाणीसाठा समाधानकारक पातळीवर पोहोचला आहे. कोयना, जायकवाडी, उजनी यांसारख्या प्रमुख धरणांसह स्थानिक जलप्रकल्पांमध्ये बऱ्यापैकी पाणी जमा झाले आहे. ही बाब आगामी उन्हाळ्याच्या दृष्टीने निश्चितच दिलासादायक आहे; मात्र पावसाने मुक्काम लवकर आटोपल्यामुळे आता उपलब्ध पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे नियोजन अत्यंत काटेकोरपणे करावे लागणार आहे.

तापमानात अचानक वाढ झाल्यामुळे धरणांमधील आणि खुल्या जलाशयांमधील पाण्याचे बाष्पीभवन मोठ्या प्रमाणात वाढते. ऑक्टोबरपासूनच बाष्पीभवनाचा वेग वाढला, तर उन्हाळ्याच्या तोंडावर पाणीटंचाईची तीव्रता अधिक जाणवू शकते. यासाठी जलसंपदा विभाग, स्थानिक प्रशासन आणि खुद्द नागरिकांनी पाण्याचा अपव्यय टाळणे गरजेचे आहे. शेतीसाठी ठिबक आणि तुषार सिंचनासारख्या सूक्ष्म सिंचन पद्धतींचा प्रभावी वापर करणे, कालव्यांऐवजी बंदिस्त पाईपलाईनद्वारे पाणी देणे आणि भूजल पुनर्भरण अधिक गांभीर्याने घेणे या गोष्टी आता केवळ पर्याय न राहता अपरिहार्यता बनल्या आहेत. पाऊस लवकर परतल्याने पाण्याच्या शहाणपणाच्या वापराची परीक्षा आतापासूनच सुरू झाली आहे. गेल्या काही दशकांमधील हवामानाचा कल पाहिला, तर मॉन्सूनच्या वर्तणुकीत प्रचंड अनिश्चितता आलेली दिसते. कधी मॉन्सून वेळेपूर्वी येतो, कधी उशिरा दाखल होतो, कधी अवकाळी अतिवृष्टी होऊन शेतीचे होत्याचे नव्हते होते, तर कधी परतीचा प्रवास चक्क नोव्हेंबरपर्यंत लांबतो. यंदा मात्र पावसाने अतिशय जलद गतीने घेतलेली माघार ही 'ग्लोबल वॉर्मिंग' आणि हवामानबदलाच्या वाढत्या प्रभावाकडे अंगुलीनिर्देश करते. वातावरणातील घटकांची ही टोकाची आंदोलने भविष्यातील संकटांची नांदी ठरू शकतात. हवामानातील या अचानक बदलाचा मानवी आरोग्यावरही तीव्र परिणाम होताना दिसतो. पावसाळ्यातील दमट आणि थंड वातावरणातून अचानक कोरड्या आणि तीव्र उकाड्याच्या वातावरणात होणारा प्रवेश मानवी शरीराला एकदम सहन होत नाही. दिवसा अंगाची लाही लाही करणारे कडक ऊन आणि रात्री हलकी गार हवा या विषम तापमानामुळे विषाणूजन्य ताप, सर्दी, खोकला, डिहायड्रेशन आणि त्वचारोगांचे प्रमाण वाढू लागते. त्यामुळे नागरिकांनाही या ऋतूबदलाच्या काळात आरोग्याची विशेष काळजी घ्यावी लागणार आहे. शेवटी, निसर्गाच्या या विराट रंगमंचावर प्रत्येक ऋतूला स्वतःचे एक वेगळे सौंदर्य आणि कर्तव्य असते. चार महिने आभाळातून अविरत कोसळून तहानलेल्या वसुंधरेला नवजीवन देणारा मेघराजा आता आपल्या कर्तव्याची सांगता करून शांत झाला आहे. त्याने दिलेले जलवैभव पदरात बांधून भावी काळाचे नियोजन करण्याची जबाबदारी आता मानवाची आहे. महाराष्ट्राच्या निम्म्या भागातून पावसाने घेतलेली ही माघार आपल्याला हेच सांगते, की आता भूतकाळातील पावसाच्या आठवणींपेक्षा भविष्यातील रब्बी हंगाम, जलव्यवस्थापन आणि आगामी गुलाबी थंडीच्या स्वागताची तयारी करण्याची वेळ आली आहे. निसर्गाच्या या परतीच्या पावलांना कृतज्ञतेने निरोप देत, संतुलित जीवनशैली आणि पर्यावरणस्नेही दृष्टीकोन स्वीकारून नव्या ऋतूच्या स्वागतासाठी सज्ज होणे हीच काळाची खरी गरज आहे. शेतकरी बंधूंनी ही बाब अवश्य लक्षात घ्यायला हवी.

विश्वासाच्या सुवर्ण परंपरेला आधुनिकतेची झळाळी

देडगावकर सराफची तीन दशकांची यशोगाथा; शुद्धता, ग्राहकविश्वासाच्या बळावर उभी राहिलेली सुवर्णपेढी

व्यवसायात यशस्वी होण्यासाठी मोठे भांडवल आवश्यक असतेच असे नाही. ग्राहकांचा विश्वास, गुणवत्तेशी तडजोड न करण्याची वृत्ती आणि काळानुसार स्वतःमध्ये बदल स्वीकारण्याची तयारी असेल, तर कोणताही व्यवसाय यशाचे शिखर गाठू शकतो. कोल्हार येथील देडगावकर सराफ यांचा प्रवास ही त्याचीच प्रेरणादायी कहाणी आहे. परंपरा जपत आधुनिकतेची कास धरणाऱ्या या सुवर्णपेढीने गेल्या तीन दशकांत ग्राहकांच्या मनात विश्वासाचे अढळ स्थान निर्माण केले आहे.

देडगावकर कुटुंबाची ओळख केवळ सुवर्णव्यवसायापुरती मर्यादित नाही. कुटुंबातील ज्येष्ठ डॉ. रामकृष्ण देडगावकर हे बालरोगतज्ज्ञ म्हणून परिसरात अत्यंत आदराचे स्थान मिळवून होते. त्यांच्या सेवाभावी कार्यामुळे डॉक्टर हे नावच कुटुंबाच्या विश्वासाचे प्रतीक बनले. नगर शहरातील गंजबाजार येथे देडगावकर नावाची सुवर्णपेढी सुमारे सत्तर वर्षांपूर्वी कार्यरत होती. त्यानंतर वैद्यकीय सेवा आणि व्यवसायाच्या निमित्ताने कुटुंब कोल्हार येथे स्थायिक झाले आणि येथून सुवर्णव्यवसायाला नवे रूप मिळाले.

सन १९९२ मध्ये दीपक रामकृष्ण देडगावकर यांनी वडिलोपार्जित व्यवसायाची धुरा स्वीकारली. फार्मासिस्टचे शिक्षण पूर्ण करूनही नोकरीचा मार्ग न निवडता त्यांनी स्वतःचा व्यवसाय उभा करण्याचा निर्णय घेतला. सुरुवातीला आर्थिक परिस्थिती अत्यंत सामान्य होती. मात्र जिद्द, मेहनत आणि ग्राहकांचा विश्वास या भांडवलावर त्यांनी व्यवसायाला स्थैर्य दिले.

त्या काळात दागिने तयार करण्यासाठी पूर्णपणे कुशल कारागिरांवर अवलंबून राहावे लागे. प्रत्येक डिझाइन हाताने घडविले जात असे. आज मात्र डिजिटल तंत्रज्ञानामुळे ग्राहकांच्या पसंतीनुसार असंख्य आकर्षक डिझाइन्स उपलब्ध होत आहेत. बदलत्या काळाचा वेध घेत देडगावकर सराफ यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार केला आणि

ग्राहकांना पारंपरिक गुणवत्ता व आधुनिक डिझाइनचा सुरेख संगम उपलब्ध करून दिला.

ग्राहकांचा विश्वास अधिक दृढ करण्यासाठी त्यांनी सातत्याने नवे उपक्रम राबविले. ग्रामीण भागात सन २००८ मध्ये हॉलमार्किंगचा परवाना मिळविणाऱ्या पहिल्या सुवर्णपेढ्यांपैकी एक म्हणून त्यांनी शुद्ध सोन्याची खात्री ग्राहकांना दिली. "शुद्धता हीच खरी ओळख" या तत्त्वावर आजही त्यांचा व्यवसाय उभा आहे.

आज व्यवसायाची सूत्रे रोहित दीपक देडगावकर यांच्याकडे आहेत. एमबीएचे शिक्षण घेतलेल्या रोहित यांनी आधुनिक व्यवस्थापन, सोशल मीडिया आणि ग्राहकाभिमुख सेवा यांची प्रभावी सांगड घालत व्यवसायाला नवी दिशा दिली आहे. त्यांच्या पाठीशी वडील दीपक देडगावकर यांचे मार्गदर्शन कायम आहे. आई वैशाली देडगावकर तसेच पत्नी सलोनी यांचे सहकार्यही व्यवसायाच्या प्रगतीत मोलाचे ठरत आहे.

देडगावकर सराफ यांची सर्वात मोठी ताकद म्हणजे ग्राहकांशी जपलेले विश्वासाचे नाते. वर्षभर विविध बचत योजना, सणासुदीच्या काळात आकर्षक ऑफर्स, दागिन्यांच्या मजुरीवर विशेष सवलत आणि ग्राहकांच्या आवडीनुसार खास डिझाइन्स उपलब्ध करून देत त्यांनी ग्राहकांशी दीर्घकालीन नाते निर्माण केले आहे. प्रत्येक व्यवहारात पारदर्शकता आणि प्रामाणिकपणा जपणे हेच त्यांचे व्यवसायाचे सूत्र आहे.

व्यवसायाबरोबरच सामाजिक जबाबदारीही त्यांनी तितक्याच संवेदनशीलतेने निभावली आहे. धार्मिक आणि सामाजिक उपक्रमांना सातत्याने सहकार्य, विविध सार्वजनिक कार्यक्रमांत सहभाग तसेच अनाथाश्रमांना मदत अशा माध्यमातून समाजाप्रती आपली बांधिलकी त्यांनी जपली आहे.

गुणवत्तेच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांची दखल म्हणून देडगावकर सराफ यांना ९००१:२०१५ हे गुणवत्ता व्यवस्थापन प्रमाणपत्र २०२५ मध्ये प्राप्त झाले. ही त्यांच्या प्रामाणिक व्यावसायिक वाटचालीची महत्त्वपूर्ण पावती ठरली. आजच्या तरुण पिढीला संदेश देताना रोहित देडगावकर सांगतात, "सोशल मीडियाचा वापर आवश्यक आहे; पण त्यात वाहवत न जाता स्वतःच्या करिअरवर आणि व्यवसायावर लक्ष केंद्रित करणे अधिक महत्त्वाचे आहे. यशासाठी संघर्षाची तयारी, सातत्य आणि प्रामाणिकपणा हेच खरे भांडवल असते."

तीन दशकांचा हा प्रवास केवळ एका सुवर्णपेढीच्या यशाचा नाही; तर विश्वास, शुद्धता आणि ग्राहकसेवेच्या मूल्यांवर उभ्या राहिलेल्या एका कुटुंबाच्या परिश्रमांचा आहे. परंपरेची श्रीमंती आणि आधुनिकतेची झळाळी यांचा सुंदर संगम साधत देडगावकर सराफ यांनी परिसरात विश्वासाचे सुवर्णपान लिहिले आहे.

दीपक रामकृष्ण देडगावकर

रोहित दीपक देडगावकर

पान १ वरून

एकतानगरमध्ये 'संजीवनी'चा राष्ट्रनाद

बँड पथकांसोबत संयुक्त सराव सुरू झाला. गेल्या दहा दिवसांपासून भारतीय लष्कराच्या पथकांसह सराव करताना संजीवनीच्या विद्यार्थ्यांनी वादनातील अचूकता, संचलनातील शिस्त, ताल-लय आणि सांघिक समन्वय यांचा उत्कृष्ट प्रत्यय दिला आहे. दिल्ली येथे झालेल्या राष्ट्रीय शालेय बँड स्पर्धेत देशात प्रथम क्रमांक पटकावल्यानंतर मिळालेली ही संधी विध्यार्थ्यांच्या मेहनतीवर आणि गुणवत्तेवर राष्ट्रीय स्तरावर उमटलेली मोहोर आहे. प्रत्येक सूर, ठेका आणि संचलनातील पाऊल अचूक साधण्यासाठी विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम घेतले. राष्ट्रीय स्तरावरील संयुक्त सरावातही त्यांनी आत्मविश्वास आणि शिस्तीचे दर्शन घडविले. संस्थेचे अध्यक्ष नितीन कोल्हे आणि मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे यांनी विद्यार्थी व मार्गदर्शकांचे अभिनंदन करून आजच्या सादरीकरणासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. विश्वस्त सुमित कोल्हे हे विद्यार्थ्यांसोबत एकतानगर येथे उपस्थित आहेत. या यशस्वी वाटचालीत विश्वस्त सुमित कोल्हे यांचे प्रोत्साहन व मार्गदर्शन, संगीत शिक्षक महेश गुरव यांचे प्रशिक्षण, कल्चरल हेड शुभम जाधव यांचे नियोजन, कॅम्पस को-ऑर्डिनेटर विजय भास्कर यांचे समन्वय आणि प्राचार्य कैलास दरेकर यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले. बँड प्रशिक्षक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचेही योगदान महत्त्वपूर्ण आहे.

गडकिल्ल्यांना मिळणार संरक्षण कवच

इतिहास, शौर्य, स्थापत्यकला आणि सांस्कृतिक वारशाचे महत्त्वपूर्ण प्रतीक आहेत. अनेक किल्ल्यांवर वाढता पर्यटकांचा वावर, नैसर्गिक झीज तसेच मानवी हस्तक्षेपामुळे ऐतिहासिक वास्तूंच्या जतनाचा प्रश्न निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा नियोजन निधीतून स्वतंत्रपणे निधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीतील किल्ल्यांच्या सुरक्षेकडेही सरकारने विशेष लक्ष दिले आहे. प्रतापगड, राजगड, साल्हेर आणि खांदेरी या चार किल्ल्यांवर अनुचित प्रकार रोखण्यासाठी सुरक्षा व्यवस्था अधिक मजबूत करण्यात येणार आहे. या चारही किल्ल्यांवर सुरक्षा रक्षक मंडळाचे एकूण ८० जवान तैनात करण्यात येणार आहेत. प्रत्येक किल्ल्यावर १९ सुरक्षा रक्षक आणि एका पर्यवेक्षकाची नियुक्ती केली जाणार आहे.

किल्ल्यांवरील ऐतिहासिक वास्तूंचे नुकसान, अनधिकृत कृत्ये आणि पर्यटकांकडून होणारे अनुचित प्रकार रोखण्यासाठी ही सुरक्षा व्यवस्था महत्त्वाची ठरणार आहे. मुंबईतील शिवडी किल्ल्याच्या संवर्धनालाही चालना देण्यात येत आहे. राज्य सांस्कृतिक कार्य विभागाच्या वैभव संगमन योजने अंतर्गत आरपीजी फाऊंडेशनने शिवडी किल्ला देखभालीसाठी दत्तक घेतला आहे. किल्ल्याच्या परिसरात भव्य संग्रहालय आणि माहिती केंद्र उभारण्याची योजना आहे. या संग्रहालयाच्या माध्यमातून शिवडी किल्ल्याचा इतिहास, सांस्कृतिक वारसा, पर्यावरण आणि मुंबईच्या सागरी वारशाशी असलेले त्याचे नाते पर्यटकांसमोर मांडण्यात येणार आहे. त्यामुळे किल्ल्याचे संवर्धन करण्याबरोबरच त्याचा इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यास मदत होणार आहे. मुंबईतील ऐतिहासिक बाणगंगा तलाव परिसराचे जतन करण्यासाठीही विविध उपक्रम राबविले जात आहेत.

या परिसराचे ऐतिहासिक आणि सांस्कृतिक महत्त्व नागरिक तसेच पर्यटकांपर्यंत पोहोचविण्यावर भर देण्यात येत आहे. वारसा जतनाच्या या उपक्रमासोबतच स्थानिक महिलांच्या आर्थिक आणि सामाजिक सक्षमीकरणालाही प्राधान्य देण्यात आले आहे. १५० हून अधिक महिलांना उद्योजकता, शिलाईकाम आणि आरोग्यविषयक प्रशिक्षण देण्यात आले आहे. त्यामुळे वारसा संवर्धनासोबत स्थानिक समुदायाच्या सहभागालाही चालना मिळत आहे.मुंबईतील वरळी किल्ला आणि वरळी कोळीवाडा परिसरात पर्यटनाच्या दृष्टीने विविध विकासकामे हाती घेण्यात आली आहेत. परिसराचे सुशोभीकरण करताना पर्यटकांना ऐतिहासिक माहिती सहज उपलब्ध व्हावी, यासाठी माहिती फलकांची उभारणी करण्यात आली आहे.

वरळी कोळीवाड्यात आतापर्यंत ७१ पेक्षा अधिक पथदिवे, ३० पेक्षा अधिक माहिती फलक आणि सातपेक्षा अधिक सार्वजनिक भित्तिचित्रे उभारण्यात आली आहेत. या माध्यमातून परिसराला आकर्षक स्वरूप देण्याबरोबरच स्थानिक इतिहास आणि संस्कृती पर्यटकांसमोर मांडण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

जिल्हा नियोजन निधीतून ३ टक्के निधी राखीव ठेवण्याच्या निर्णयामुळे जिल्हानिहाय असलेल्या ऐतिहासिक स्थळांच्या संवर्धनासाठी नियमित निधी उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. त्याचबरोबर पुरातत्त्व विभागाची तांत्रिक मान्यता बंधनकारक असल्याने संवर्धनाची कामे शास्त्रीय पद्धतीने करण्यास मदत होणार आहे. राज्यातील गडकिल्ले, मंदिरे, तलाव, किल्ले परिसर आणि ऐतिहासिक वास्तू हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाचा अमूल्य ठेवा आहे. या वारशाचे जतन करताना आधुनिक सुविधा, सुरक्षितता आणि पर्यटनविकास यांचा समतोल साधण्याचा प्रयत्न या निर्णयातून करण्यात येत आहे.

कर्जाला कंटाळून शेतकऱ्याची आत्महत्या

कर्जाची परतफेड कशी करायची, या विवंचनेत ते होते. कर्जदारांकडून वारंवार तगादा होत असल्याचेही सांगण्यात येते.

कुटुंबातील दोन्ही मुले मोठी असली तरी त्यांना कायमस्वरूपी रोजगार नसल्याने कुटुंबाचा उदरनिर्वाह रोजंदारीच्या कामावर अवलंबून होता. परिस्थिती सुधारेल आणि कर्ज फेडता येईल, या आशेवर खणकर कुटुंब परिस्थितीशी झुंज देत होते. मात्र, आर्थिक अडचणी दिवसेंदिवस गंभीर होत गेल्या.

बुधवारी पत्नी आणि दोन्ही मुले रोजंदारीच्या कामासाठी बाहेर गेल्यानंतर दीपक खणकर यांनी शेतातील राहत्या घरी आत्महत्या केली. कुटुंबीय घरी परतल्यानंतर ही घटना त्यांच्या निदर्शनास आली. मात्र, तोपर्यंत त्यांचा मृत्यू झाला होता.

या घटनेने बाभुळवाडे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. शेतीतील अनिश्चित उत्पन्न, वाढता उत्पादन खर्च, कर्जाचा वाढता भार आणि ग्रामीण भागातील रोजगाराची कमतरता यामुळे शेतकरी कुटुंबांसमोरील आर्थिक संकट पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. दरम्यान, पारनेर पोलीस अधीक्षक सोमनाथ दिवटे यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रकरणाचा तपास सुरू आहे.

पान १ वरून

राज्यात तीन महिन्यांत राजकीय भूकंप?

संकेत दिले जात आहेत. मात्र, नेमके काय चालले आहे, हे थेट सांगता येणार नाही. मुख्यमंत्री बदलाची चर्चा आणि त्यानंतर एकनाथ शिंदे यांचे पुढे येणारे नाव यामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. त्यामुळे राज्यातील आगामी राजकीय घडामोडींवर लक्ष ठेवणे महत्त्वाचे आहे, असेही त्यांनी सूचित केले.

एकनाथ शिंदे हे सर्वसामान्यांचे नेते असल्याचे सांगत शिरसाट यांनी आगामी काळ शिवसेनेसाठी महत्त्वाचा असल्याचा दावाही केला. त्यामुळे शिंदे यांच्या नेतृत्वाबाबत सुरू असलेल्या चर्चांकडे दुर्लक्ष करता येणार नसल्याचे त्यांनी नमूद केले.

मुंबईत २९ ऑक्टोबर रोजी झालेल्या पुस्तक प्रकाशन कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकाच मंचावर आले होते. या घटनेवरून नव्या राजकीय समीकरणांच्या चर्चांना सुरुवात झाली आहे. मात्र, केवळ ठाकरे बंधू आणि मुख्यमंत्री एकाच मंचावर आले म्हणून लगेच नवी राजकीय आघाडी तयार होईल, असे म्हणणे योग्य नसल्याचे शिरसाट यांनी स्पष्ट केले.

मात्र, भाजप नेते आशिष शेलार आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यात नेमकी काय चर्चा झाली, हा संशोधनाचा विषय आहे, असे शिरसाट यांनी म्हटले. या दोन्ही नेत्यांमध्ये काही राजकीय रणनीतीवर चर्चा झाली आहे का, याकडे लक्ष देणे अधिक महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सूचित केले.

दरम्यान, भाजपचे मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी शिवसेना नेत्यांवर केलेल्या आक्रमक टीकेवरून महायुतीतील वातावरण तापले आहे. यावर शिरसाट यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

नवनाथ बन यांनी आपली पातळी पाहून विधाने करावीत, असे सांगत शिरसाट यांनी त्यांच्या वक्तव्यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची अधिकृत मान्यता आहे का? असा सवाल उपस्थित केला. महायुतीमध्ये कोणताही उघड वाद नसल्याचा दावा करतानाच अशा वक्तव्यांमुळे गैरसमज निर्माण होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

२०१९ नंतरच्या राजकीय घडामोडींची आठवण करून देताना शिरसाट यांनी भाजपला अप्रत्यक्ष इशाराही दिला. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली आम्ही २०१९ मध्ये उठाव केला नसता, तर आज भाजप पुन्हा सत्तेत दिसली नसती, असा दावा त्यांनी केला.

त्यामुळे महायुतीतील अंतर्गत राजकीय तणावाच्या पार्श्वभूमीवर शिरसाट यांच्या वक्तव्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. मुख्यमंत्रीपद, एकनाथ शिंदे यांचे नेतृत्व, ठाकरे बंधूंच्या संभाव्य जवळिकीच्या चर्चा आणि भाजप-शिवसेनेतील वाढता शब्दसंघर्ष यामुळे पुढील काही महिने महाराष्ट्राच्या राजकारणासाठी अत्यंत निर्णायक ठरण्याची शक्यता आहे.

प्रवरेची वाळू लुटणारे पकडले

तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पाहणीदरम्यान दोन ट्रॅक्टर लोखंडी यारीसह आणि अंदाजे ३० ब्रास वाळूसाठा आढळून आला. ट्रॅक्टर मालक तसेच वाळूसाठा कोणी करून ठेवला, याबाबत चौकशी केली असता कोणतीही ठोस माहिती मिळाली नाही.

महसूल विभागाच्या प्राथमिक तपासणीत सदर वाळू प्रवरा नदीपात्रातून विनापरवाना काढून विक्रीच्या उद्देशाने नदीपात्रालगत साठवून ठेवण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात आला. उपविभागीय अधिकारी विनीत शिर्के यांनी पंचांसमक्ष पंचनामा करून दोन्ही ट्रॅक्टर व वाळूसाठा असा एकूण ६ लाख १८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. जप्त केलेली वाहने पुढील कार्यवाहीसाठी राहुरी तहसील कार्यालयात जमा करण्यात आली.या प्रकरणी ग्राम महसूल अधिकारी जालिंदर अर्जुन पाखरे यांच्या फिर्यादीवरून राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्र. १२०७/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) तसेच पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ मधील कलम १५ व ३ प्रमाणे अज्ञात ट्रॅक्टर मालकांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई ग्राम महसूल अधिकारी जालिंदर पाखरे, प्रविण जाधव, गणेश लोखंडे, महसूल सेवक योगेश झुगे तसेच राहुरी पोलीस ठाण्याचे पोलीस कर्मचारी शेषराव कुटे यांच्या पथकाने केली.

चारा टंचाईवर शासनाचा 'मास्टर प्लॅन'

उपयुक्तता तपासणे आवश्यक राहणार आहे. मुरघास खरेदी करतानाही गुणवत्तेची विशेष काळजी घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. खरेदी करण्यात येणारा मुरघास हवाबंद अवस्थेत असावा. त्यामध्ये कोणत्याही प्रकारची बुरशी नसावी, अशी अट घालण्यात आली आहे. निकृष्ट दर्जाचा किंवा पशुधनाच्या आरोग्यास धोका निर्माण करणारा मुरघास खरेदी होऊ नये, यासाठी गुणवत्ता तपासणीला महत्त्व देण्यात आले आहे. चाऱ्याच्या विविध घटकांची तपासणी करण्यासाठी पुणे, औंध यांसह शासनमान्य प्रयोगशाळांमध्ये आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्यामुळे चारा खरेदी करताना नमुने तपासून त्याचा दर्जा निश्चित करण्यास मदत होणार आहे. सुका चारा आणि मुरघासासाठी सरकारने निश्चित केलेले दर हे केवळ चाऱ्याच्या खरेदीसाठी आहेत. या दरांमध्ये वाहतूक खर्चाचा समावेश करण्यात आलेला नाही. सुका चारा प्रतिकिलो १२ रुपये आणि मुरघास प्रतिकिलो ८ रुपये या कमाल दरांव्यतिरिक्त वाहतूक खर्चासाठी स्वतंत्र निधी उपलब्ध करून देण्याची तरतूद शासनाने केली आहे. चारा कोणत्या ठिकाणाहून कोणत्या ठिकाणी वाहून आणला जात आहे, यानुसार परिवहन आयुक्तांनी वेळोवेळी निश्चित केलेले वाहतूक दर लागू राहणार आहेत. त्यामुळे चारा खरेदीच्या दराबरोबरच त्याच्या वाहतुकीचा खर्चही शासनाच्या नियमानुसार स्वतंत्रपणे भागविला जाणार आहे. राज्यातील ३०४ दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये परिस्थितीनुसार चारा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाला या निर्णयाचा आधार मिळणार आहे. स्थानिक पातळीवर चारा उपलब्धतेचे नियोजन, गरजेनुसार खरेदी आणि वाहतूक याला यामुळे गती मिळण्याची शक्यता आहे. २०२६-२७ या दुष्काळाच्या कालावधीत सुका चारा आणि मुरघास खरेदीसाठी हे दर लागू राहणार आहेत. शासनाने दर निश्चित करताना चाऱ्याची गुणवत्ता, उपलब्धता, वाहतूक आणि पशुधनाच्या गरजा यांचा विचार केला आहे. त्यामुळे दुष्काळाची तीव्रता वाढल्यास चारा टंचाई निर्माण होण्यापूर्वीच प्रशासनाला उपाययोजना करण्याची संधी मिळणार आहे.

शेवगावात ६३४५ रेशनधारकांचे धान्य बंद

अन्नसुरक्षा कायद्यातील उत्पन्न मर्यादा ओलांडल्याने कारवाई

जनता आवाज वृत्तसेवा

शेवगाव : शासनाच्या मिशन सुधार योजनेअंतर्गत शेवगाव तालुक्यातील ६३४५ शिधापत्रिकाधारकांचे स्वस्त धान्य बंद करण्यात आले आहे. उत्पन्न गट, निष्क्रीय लाभार्थी, आर्थिक उलाढाल आणि अन्नसुरक्षा कायद्यातील निर्धारित उत्पाद मांदा ओलांडणाऱ्या या चार निकषानुसार ही कारवाई करण्यात आली आहे. त्यामुळे संबंधित कुटुंबांना सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत मिळणाऱ्या धान्याचा लाभ बंद झाला असून, ऐन दिवाळी सणाच्या तोंडावर पात्र लाभार्थ्यांच्या पडताळणीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. त्यामुळे खळबळ उडाली आहे.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील पात्र लाभार्थ्यांची पडताळणी करून अपात्र लाभार्थ्यांची ओळख निश्चित करण्यासाठी शासनाकडून मिशन सुधार अंतर्गत प्रक्रिया राबविण्यात येत आहे. यामध्ये लाभार्थ्यांचे उत्पन्न, दीर्घकाळ धान्य न उचलणारे आहे. त्यामुळे धान्याचा लाभ बंद झालेल्या लाभार्थ्यांनी आपली पात्रता तपासून आवश्यक कागदपत्रे सादर करावीत, जेणेकरून पात्र कुटुंबांना नियमानुसार लाभ पुर्ववत करण्याची प्रक्रिया पूर्ण करता येणार येईल.

निष्क्रय लाभार्थी, आर्थिक उलाढालीच्या नोंदी आणि कंपनीच्या संचालकपदाशी संबंधित माहिती तपासली जात आहे. या निकषांनुसार शेवगाव तालुक्यातील ६३४५ शिधापत्रिकाधारकांचे धान्य बंद करण्यात आले आहे. शासनाच्या अन्नसुरक्षा योजनेतून पात्र कुटुंबांना रास्त भाव दुकानांमार्फत धान्य उपलब्ध करून दिले जाते. मात्र, या योजनेचा लाभ मिळवण्यासाठी निश्चित केलेल्या उत्पन्नाच्या निकषांची पूर्तता करणे आवश्यक आहे.

कुटुंबाचे किंवा कुटुंबातील सदस्यांचे वार्षिक उत्पन्न निर्धारित मयदिपेक्षा अधिक असल्याचे आढळून आल्याने संबंधित कुटुंबाचा धान्याचा लाभ बंद केला जात आहे. रेशन कार्डवरील धान्याचा लाभ बंद झाला म्हणजे रेशन कार्डच रद्द झाले, असा त्याचा अर्थ नाही. संबंधित रेशनकार्डाचा इतर आवश्यक कामांसाठी वापर करता येतो, असेही पुरवठा विभागाने स्पष्ट केले आहे.

लाभार्थ्यांची पडताळणी

प्रशासनाने १० कडक निकषांच्या आधारे लाभार्थ्यांची पडताळणी केली. यासाठी भूमी अभिलेख विभाग, कृषी विभाग, प्रादेशिक परिवहन विभाग (आरटीओ), आयकर विभाग आणि आधार कार्ड यांच्याकडील माहितीचा डेटा आपापसात जुळण्यात आला. दहिगांवने २११, भावीनिमगाव ६०, शहरटाकळी ९०, देवटाकळी ३०, सुलतानपूर ३१, मजलेशहर १२, राजणी ९, दौरसडे ६ कुपने बंद करण्यात आली आहे.

हार्वेस्टरने ऊसतोडणीचा मजुरांसह पशुधनाला फटका

जनता आवाज वृत्तसेवा

बोधेगाव : साखर कारखान्यांचे धुराडे पेटल्याने शेवगाव तालुक्यात ऊसतोडणीला सुरुवात झाली. मात्र, या क्षेत्रात आता हार्वेस्टरचा वापर वाढला असून, मजुरांसह पशुधनाच्या चाऱ्याला फटका बसत आहे. हार्वेस्टरमुळे ऊसतोडणीचा वेग कमालीचा वाढला असला, तरी उसाचे वाढे जनावरांसाठी उपलब्ध होत नसल्याने पशुपालकांसमोर संकट उभे राहिले आहे.

शेवगाव, पाथर्डी, तसेच पैठण तालुक्यातील ज्ञानेश्वर, वृद्धेश्वर, केदारेश्वर, गंगामाई, रेणुका शरद व गुळमेश्वर आदी कारखान्यांना शेवगाव तालुक्यातून ऊसपुरवठा होतो. बोधेगाव परिसरात अनेक कारखान्यांचे हार्वे स्टर दाखल झाले आहेत. यंत्रांच्या साहाय्याने दिवस-रात्र मोठ्या प्रमाणावर ऊसतोडणी सुरू आहे. त्यामुळे कोयत्याने ऊसतोड करणाऱ्या मजुरांचे काम कमी झाले आहे. ऊसतोडणीचा हंगाम चार ते साडेचार महिने चालतो, परंतु यंदा पावसाअभावी उसाचे क्षेत्र घटले असून, त्यात हार्वेस्टरच्या वापरामुळे वेगात ऊसतोडणी सुरू आहे. त्यामुळे दोन महिन्यांत हंगाम आटोपण्याची चिन्हे आहेत.

यंदा ग्रामीण भागात हिरव्या चाऱ्याची मोठी टंचाई आहे. अशा वेळी ऊसतोडणीनंतर मिळणारे ताजे वाढे जनावरांसाठी सर्वात मोठा आधार ठरतात. अनेक शेतकरी व पशुपालक ऊसाच्या वाढ्यांवरच चाऱ्याची गरज भागवतात. मात्र, हार्वेस्टरद्वारे ऊसतोडणी करताना उसाचे पाचट आणि पानाचे तुकडे होऊन ते मातीत मिसळले जाते.

रब्बी ज्वारी मिनीकिट्स शेतकऱ्यांना देणार

महाडीबीटीवर नोंदणी करा; बोराळे यांचे आवाहन

जनता आवाज वृत्तसेवा

अहिल्यानगर : रब्बी हंगामात ज्वारी पिकाचे क्षेत्र वाढविण्यासह शेतकऱ्यांची उत्पादकता वाढविण्यासाठी केंद्रय राज्य शासनातर्फे विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. राष्ट्रीय अन्न सुरक्षा राणि पोषण उपअभियानाअंतर्गत पौष्टिक तृणधान्य (रब्बी ज्वारी) सन २०२६-२७ या योजनेंतर्गत जिल्ह्यासाठी २१ हजार २० बियाण मिनीकिट्सचे उद्दिष्ट मंजूर करण्यात आले आहे. महाडीबीटीवर शेतकऱ्यांनी नोंदणी करावी, असे आवाहन अहिल्यानगरचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांनी केले आहे

कमी पर्जन्यमान आणि संभाव्य दुष्काळसदृश परिस्थिती लक्षात घेता, कमी पाण्यात चांगले उत्पादन देणाऱ्या, तसेच दर्जेदार चारा उपलब्ध करून देणाऱ्या रब्बी ज्वारी पिकाला प्रोत्साहन देण्यावर शासनाचा भर आहे. या योजनेमुळे वार्णाच्या बियाण्यांचा लाभ मिळणार आहे. प्रतिकूल परिस्थितीतही पीक उत्पादन टिकवून ठेवण्यास मदत होणार आहे. रब्बी ज्वारी ते अन्नधान्याबरोबरच पशुधनासाठी दर्जेदार चारा उपलब्ध करून देणारे महत्त्वाचे पीक आहे. कमी पाण्यात येणाऱ्या या पिकाच्या लागवडीला प्रोत्साहन मिळाल्यास शेतकऱ्यांचे संभाव्य आर्थिक नुकसान कमी करण्यास आणि शेतीची उत्पादकता वाढविण्यास मदत होऊ शकते. ज्वारीसाठी प्रसिद्ध असलेल्या अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत-जामखेड तालुक्यातही दुष्काळी स्थिती आहे, तरी ज्यांच्याकडे पाणी आहे, त्या शेतकऱ्यांनी कमी पाण्यावर वेणाऱ्या ज्वारीची पेरणी प्रतिवर्षाप्रमाणे करावी.

शेतकऱ्यांना सुधारित योजनेसाठी महाडीबीटीच्या संकेत स्थळावर अर्ज करण्यासाठी दहा दिवसांची मुदत आहे. २०२६-२७ हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष म्हणून संयुक्त राष्ट्र संघाने घोषित केले आहे. त्यामुळे या योजनेंतर्गत महिलांना प्राधान्याने लाभ द्यावयाचा आहे. महिला खातेदारांनी महाडीबीटी पोर्टलवर जास्तीत जास्त अर्ज करावेत. अधिक माहितीसाठी संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा. १० नोव्हेंबरला बियाणांचे वाटप करण्यात येणार आहे.

आधार नोंदणी शिबीरास विद्यार्थ्यांचा प्रतिसाद

जनता आवाज वृत्तसेवा

कोपरगाव : येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्री सद्गुरु गंगागीर महाराज महाविद्यालयात भारतीय डाक विभाग आणि महाविद्यालय प्रशासन यांच्या संयुक्त सहकार्याने इयत्ता अकरावी-बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी नुकतेच आधार नोंदणी व अद्ययावतीकरण शिबिर मोठ्या उत्साहात संपन्न झाले आहे. या शिबिराचा सुमारे ४०० विद्यार्थ्यांनी लाभ घेतला असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.

श्री सद्गुरू गंगागिरीजी महाराज महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवेशासह विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी आणि दैनंदिन कामकाजासाठी आधार कार्डावरील माहिती अद्ययावत असणे महत्त्वाचे आहे. ही बाब लक्षात घेऊन इयत्ता अकरावी-बारावीच्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयातच आधारविषयक सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हे शिबिर आयोजित करण्यात आले होते. त्याबद्दल पालक विद्यार्थ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

कोपरगाव पोस्ट ऑफिसच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराला एस.एस.जी.एम. कॉलेजचे प्राचार्य डॉ. माधव सरोदे, श्रीरामपूर डाक विभागाचे अधीक्षक जनवाडे, केंद्रे आणि कोपरगावचे पोस्टमास्तर रवींद्र परदेशी, प्रसाद वसमतकर आर्दीचे सहकार्य लाभले होते.

दुष्काळी मदत सरसकट सर्व शेतकऱ्यांना द्या

शिवसेनेची तहसीलदारांकडे निवेदनाद्वारे मागणी

जनता आवाज वृत्तसेवा

पाथर्डी : तालुक्यात यंदा दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. पावसाअभावी खरीप हंगामातील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, शेतीचे उत्पन्न घटल्याने शेतकऱ्यांसमोर आर्थिक अडचणींचा डोंगर उभा राहिला आहे. अशा परिस्थितीत शासनाकडून जाहीर करण्यात आलेली आर्थिक मदत सरसकट सर्व शेतकऱ्यांना द्यावी. मदत वाटप करताना कोणत्याही प्रकारचे जाचक निकष लावू नयेत तसेच अनावश्यक कागदपत्रांची अट घालू नये, अशी मागणी शिवसेनेचे उद्धव बाळासाहेब ठाकरे गट तालुकाप्रमुख भगवान दराडे यांनी केली आहे.

यासंदर्भात त्यांनी तहसीलदार डॉ. उद्धव नाईक यांची भेट घेऊन निवेदन दिले. यावेळी शिवसेनेचे शहरप्रमुख भाऊसाहेब धस, राजू सोनटक्के, विकास मोरे, फुलचंद चिमटे, अविनाश पालवे, संतोष जिरेसाळ, नागनाथ गर्जे आदी उपस्थित होते. दुष्काळाच्या झळा तालुक्यातील सर्वच शेतकऱ्यांना बसल्या असून, शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची झाली आहे. शेतीच्या उत्पादनावर अवलंबून असलेल्या कुटुंबांना दैनंदिन खर्च भागविणेही कठीण झाले आहे. त्यामुळे शासनाने जाहीर केलेली मदत प्रत्यक्षात प्रत्येक गरजू शेतकऱ्यापर्यंत पोहोचणे आवश्यक आहे, असे निवेदनात म्हटले आहे.

भगवान दराडे म्हणाले, यंदाच्या दुष्काळाने शेतकऱ्यांचे आर्थिक कंबरडे मोडले असून, शेतकऱ्यांच्या हातात उत्पन्नाऐवजी कर्ज आणि संकटे आली आहेत. अशा परिस्थितीत शासनाची आर्थिक मदत ही शेतकऱ्यांसाठी मोठा आधार ठरणार आहे. मात्र, मदत वाटपात किचकट निकष आणि कागदपत्रांच्या अटी लावल्यास अनेक शेतकरी मदतीपासून वंचित राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे कोणताही भेदभाव न करता सरसकट सर्व शेतकऱ्यांच्या खात्यावर मदतीची रक्कम जमा करावी.

संजीवनीचा सांस्कृतिक महोत्सव उत्साहात

विद्यार्थ्यांनी साकारले सांस्कृतिक वैभवाचे मनमोहक दर्शन

जनता आवाज वृत्तसेवा

कोपरगाव : संजीवनी अकॅडमीच्या प्राथमिक विभागाचा क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव झेप, प्रगती आणि सिंहगर्जना या संकल्पनेवर आधारित उत्साहपूर्ण वातावरणात नुकताच संपन्न झाला. विद्यार्थ्यांमध्ये क्रीडाभावना, शिस्त, सांघिक वृत्ती, आत्मविश्वास आणि नेतृत्वगुण विकसित करण्याच्या उद्देशाने आयोजित या महोत्सवात विध्यार्थ्यांनी विविध क्रीडाप्रकारांसह सादर केलेल्या आकर्षक झांक्यांनी (दृश्यस्वरूपातील कलात्मक सादरीकरण) आणि सामूहिक कवायतींनी उपस्थितांची मने जिंकली.

या महोत्सवाला संजीवनी विद्यापीठाचे प्रेसिडेंट अमित कोल्हे, संजीवनीच्या संचालिका डॉ. मनालीताई कोल्हे, नाशिक येथील प्रसिद्ध उद्योजक, काळाराम मंदिराचे विश्वस्त व संजीवनी पॉलिटेक्निकचे माजी विद्यार्थी मिलिंद तारे, संजीवनी विद्यापीठाचे व्हाईस चांसलर डॉ. ए. जी. ठाकूर, पॉलिटेक्निकचे प्राचार्य ए. आर. मिरिकर, संजीवनी अकॅडमीच्या प्राचार्या सुधा सुब्रमण्यम, संजीवनी अकॅडमीची माजी विद्यार्थिनी अनुष्का सोनवणे आदी मान्यवर उपस्थित होते. प्राथमिक विभागातील इयत्ता पहिली ते चैथीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेतून आणि कलागुणांतून विविध विषयांवर आधारित झांक्यांचे सादरीकरण केले. यामध्ये प्राचीन भारतीय खेळ, आदिवासी जीवनशैली व परंपरा, भारतातील पवित्र नद्या, पर्वतरांगा, सांस्कृतिक वारसा, विविध देशांच्या संस्कृती तसेच जागतिक वैविध्य अशा अनेक विषयांचा समावेश होता. वेशभूषा, आकर्षक सजावट, विषयाला अनुरूप मांडणी आणि विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे प्रत्येक सादरीकरणाने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

यावेळी मिलिंद तारे यांनी विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट सादरीकरणाचे, त्यांच्या शिस्तीचे तसेच शिक्षकांनी घेतलेल्या मेहनतीचे विशेष कौतुक केले. विद्यार्थ्यांमधील कल्पकता, उत्साह आणि सांघिक भावना पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले. माजी विद्यार्थिनी अनुष्का सोनवणे हिने आपल्या शालेय आठवणींना उजाळा देताना शाळेतील शिक्षकांचा आपल्या जीवनाच्या जडणघडणीत मोलाचा वाटा असल्याचे आवर्जून नमूद केले.

झेप, प्रगती आणि सिंहगर्जना या घोषवाक्याला साजेसा असा हा क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव अत्यंत लक्षवेधी आणि प्रेरणादायी ठरला. संजीवनी अकॅडमीच्या शैक्षणिक, क्रीडा आणि सांस्कृतिक अशा सर्व उपक्रमांना पालकांचा सातत्यपूर्ण पाठिंबा मिळत आहे, ही आमच्यासाठी आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे. ज्ञानदानासोबतच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्याचे व्रत संस्थापक स्व. शंकरराव कोल्हे यांनी सुरू केले असून, संस्थेचे अध्यक्ष नितीन कोल्हे आणि मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली हे कार्य अविरतपणे पुढे सुरू आहे. विद्यार्थ्यांनी केवळ शैक्षणिक क्षेत्रातच नव्हे, तर राष्ट्रीय स्तरावरील विविध स्पर्धांमध्येही उल्लेखनीय यश संपादन करावे, हा संजीवनी अकॅडमीचा नेहमीच प्रयत्न राहिला आहे आणि तो प्रत्यक्ष कृतीतही येत आहे. विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देत त्यांच्यात आत्मविश्वास, नेतृत्वक्षमता, शिस्त आणि सांघिक भावना रुजविण्यासाठी असे उपक्रम अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत.

– डॉ. मनाली कोल्हे, संचालिका

इंग्रजी शाळांमध्येही पवित्र पोर्टल लागू करा!

जनता आवाज वृत्तसेवा

सोनई : राज्यातील शहरी तसेच ग्रामीण भागात इंग्रजी माध्यमाच्या शाळा आणि पब्लिक स्कूलची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. सोनई परिसरामध्येही या खासगी शाळा मोठ्या प्रमाणात आहेत. या शाळांकडून आपला पालक दाखल करताना किंवा प्रवेश घेताना पालकांकडून हजारो रुपयांचे शुल्क आकारले जाते. मात्र, विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी आवश्यक शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता असलेले प्रशिक्षित शिक्षक नियुक्त केले जातात का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. इंग्रजी माध्यमाच्या शाळांमधील शिक्षक भरती प्रक्रियेतही पवित्र पोर्टल सारखी गुणवत्ता आधारित आणि पारदर्शक व्यवस्था लागू करावी, अशी मागणी पालकवर्गातून होत आहे. इंग्रजी माध्यमाच्या काही शाळांमध्ये केवळ बारावी उत्तीर्ण किंवा पदवीचे शिक्षण घेतलेल्या तरुण-तरुणींना कमी मानधनावर शिक्षक म्हणून कामावर ठेवले जात आहे. अशा शिक्षकांकडे इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व, विषयाचे ज्ञान आणि प्रभावी अध्यापनासाठी आवश्यक कौशल्ये आहेत का, याची तपासणी होणे गरजेचे आहे. विशेष म्हणजे, विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित या महत्त्वाच्या विषयाकडे संबंधित यंत्रणांकडून पुरेसे लक्ष दिले जात आहे का, असाही प्रश्न उपस्थित होत आहे. भरमसाठ शुल्क, इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये प्रवेश घेताना पालकांना मोठ्या प्रमाणात शुल्क भरावे लागते. सोबतच गणवेश, पुस्तके, वाहतूक आणि इतर विविध कारणांसाठी खर्च करावा लागतो. मात्र, एवढा खर्च करूनही मुलांना अपेक्षित दर्जाचे शिक्षण मिळते का, याबाबत पालकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे.

कांचनवाडी- कोकमठाण रस्त्याचे काम पूर्ण करा

जनता आवाज वृत्तसेवा

कोपरगाव : तालुक्यातील कोकमठाण येथील देवयानी डेअरी-कांचनवाडी ते कोकमठाण (ई. जि. मा. ५) या महत्त्वाच्या रस्त्याचे काम मागील दोन वर्षांपासून रखडले असून, नागरिकांना दररोज गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. आमदार आशुतोष काळे यांच्या हस्ते या रस्त्याच्या कामाचे मोठ्या थाटामाटात भूमिपूजन करण्यात आले होते. मात्र, भूमिपूजनानंतरही रस्त्याचे काम पूर्णत्वास गेले नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. संबंधित विभागाने तातडीने लक्ष घालून रस्त्याचे काम पूर्ण करावे, अशी मागणी ज्येष्ठ नेते शरदराव थोरात यांनी केली आहे.कोकमठाण, संवत्सर, सडे आणि परिसरातील इतर गावांतील नागरिकांसाठी कोपरगाव शहरात ये-जा करण्याचा हा महत्त्वाचा दळणवळणाचा मार्ग आहे. विद्यार्थी, शेतकरी, नोकरदार, व्यापारी तसेच वाहनधारक मोठ्या प्रमाणावर या रस्त्याचा वापर करतात. मात्र, रस्त्याचे काम अपूर्ण असल्याने नागरिकांना दररोज प्रवास करताना अडचणींचा सामना करावा लागत आहे. सध्या रस्त्यावर केवळ खडी टाकून ठेवण्यात आली असून, प्रत्यक्ष काम पूर्ण झालेले नाही. त्यामुळे वाहनचालकांना कसरत करत प्रवास करावा लागत आहे. विशेषतः पावसाळ्यात रस्त्यावर चिखल आणि खड्डे निर्माण झाल्याने परिस्थिती अधिक बिकट होते. दुचाकीस्वारांचे अपघात होण्याची शक्यता वाढते, तर शाळा-महाविद्यालयांत जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण होतो. शेतमालाची वाहतूक करतानाही शेतकऱ्यांना अडचणी सहन कराव्या लागतात. महत्त्वाच्या रस्त्याचे भूमिपूजन करून दोन वर्षे उलटूनही काम पूर्ण होत नसेल, तर नागरिकांनी गैरसोय किती काळ सहन करायची, असा सवालही उपस्थित होत आहे. केवळ भूमिपूजन आणि घोषणांपुरते विकासकाम मर्यादित न राहता ते प्रत्यक्षात पूर्ण होणे आवश्यक आहे.

दुष्काळी परिस्थितीत कर्जवसुलीला स्थगिती द्या !

छावा संघटनेचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जागरण गोंधळ

जनता आवाज वृत्तसेवा

अहिल्यानगर : जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन बँका, पतसंस्था आणि फायनान्स कंपन्यांकडून करण्यात येणाऱ्या कर्जवसुलीला स्थगिती कर्जवसुलीच्या द्यावी, तसेच नावाखाली नागरिकांना धमकावणे, दहशत निर्माण करणे आणि मारहाण करून पैसे वसूल करण्याच्या कथित प्रकाराना आळा घालावा, या मागण्यांसाठी अखिल भारतीय सह्याद्री छावा संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जागरण गोंधळ आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात अखिल भारतीय सह्याद्री छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष रावसाहेब काळे, छावा संघटना भटके-विमुक्त आघाडीचे प्रदेशाध्यक्ष सुभाष काकडे, जिल्हाध्यक्ष उत्तम पवार, धडक जनरल कामगार संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्रीधर शेलार,स्वराज्य पक्षाचे जिल्हाप्रमुख योगेश शेंडगे, जनार्दन कंद, शिवसेना सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष विनोद साळवे आदी सहभागी झाले होते. जिल्ह्यात दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी, शेतमजूर आणि सर्वसामान्य नागरिक आर्थिक संकटाचा सामना करत आहेत. अशा परिस्थितीत कर्जाच्या हप्त्यांसाठी तगादा लावला जात असल्यास आर्थिक अडचणीत असलेल्या नागरिकांवरील ताण अधिक वाढू शकतो. त्यामुळे परिस्थितीचा विचार करून कर्जवसुलीला स्थगिती देण्याबाबत शासन व प्रशासनाने योग्य निर्णय घ्यावा, अशी मागणी संघटनेने केली. फायनान्स कंपन्यांकडून कर्जवसुलीसाठी काही ठिकाणी अनधिकृत एजंटांची नियुक्ती केली जात असून, त्यांच्यामार्फत नागरिकांवर दबाव आणला जात असल्याचा आरोप संघटनेने केला आहे.

जिल्हा बँकेच्या सत्तेसाठी अखेरची मोर्चेबांधणी

जिल्हा बँकेचा सत्तासंघर्ष शिगेला; २ नोव्हेंबरला मतदान; ३ नोव्हेंबरला मतमोजणी

जनता आवाज वृत्तसेवा

अहिल्यानगर : अहिल्यानगर जिल्ह्याच्या सहकार क्षेत्रातील प्रतिष्ठेची आणि राजकीय वर्तुळाचे लक्ष लागून राहिलेली दि. अहमदनगर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या संचालक मंडळाची पंचवार्षिक निवडणूक आता निर्णायक टप्प्यावर आली आहे. सन २०२६ ते २०३१ या कालावधीसाठी होणाऱ्या या निवडणुकीत येत्या २ नोव्हेंबर रोजी जिल्ह्यातील १४ तालुक्यांत मतदान होणार असून, ३,८३७ अंतिम मतदार संचालक मंडळाचे भवितव्य ठरविणार आहेत. मतदानानंतर ३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार असल्याने जिल्हा बँकेच्या सत्तेचा कौल अवघ्या काही दिवसांत स्पष्ट होणार आहे.

निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था मंगेश सुरवसे यांनी २९ ऑक्टोबर रोजी जाहीर प्रकटन प्रसिद्ध करून मतदान व मतमोजणीचे वेळापत्रक जाहीर केले आहे. त्यानुसार २ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. अकोले, जामखेड, कर्जत, कोपरगाव, अहिल्यानगर, नेवासा, पारनेर, पाथर्डी, राहाता, राहुरी, संगमनेर, शेवगाव, श्रीगोंदा आणि श्रीरामपूर या १४ तालुक्यांत स्वतंत्र मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे.

या निवडणुकीसाठी प्राथमिक कृषी संस्थांचे १,३६१, शेतीपूरक संस्थांचे ८८४, बिगरशेती संस्थांचे १,५६२ आणि वैयक्तिक मतदारांचे ३०, असे एकूण ३,८३७ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. त्यामुळे प्रत्येक मतदारसंघात कोणाला किती पाठबळ मिळते, याकडे सहकार क्षेत्रासह जिल्ह्यातील राजकीय नेत्यांचे लक्ष लागले आहे. मतदानासाठी अंतिम मतदार यादीतील पात्र सभासदांनाच प्रवेश दिला जाणार आहे. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने मान्य केलेल्या १४ प्रकारच्या ओळखपत्रांपैकी कोणताही एक ओळख पुरावा सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. राहुरी तालुक्यात सौ. भागीरथीबाई तनपुरे कन्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, कॉलेज रोड येथे मतदान होणार आहे. मतदानानंतर दुसऱ्याच दिवशी, म्हणजे ३ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ वाजता नेप्ती येथील अमरज्योत लॉन्स, नगर-कल्याण रस्ता, बायपास चौक येथे मतमोजणीला सुरुवात होणार आहे. मतमोजणीसाठी नियुक्त प्रतिनिधींना सकाळी ७.३० वाजता उपस्थित राहणे आवश्यक आहे. तसेच हे प्रतिनिधी अंतिम मतदार यादीतील पात्र मतदार असणे बंधनकारक आहे.

३ नोव्हेंबरला सत्तेचा खरा फैसला

जिल्हा बँक ही केवळ आर्थिक संस्था नसून जिल्ह्यातील सहकार, शेती आणि राजकारणाच्या सत्ताकारणाचे महत्त्वाचे केंद्र मानले जाते. त्यामुळे या निवडणुकीतील प्रत्येक मताला मोठे राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे. प्रचार, राजकीय समीकरणे, गाठीभेटी आणि पडद्यामागील रणनीतीनंतर आता अंतिम कौल मतपेटीतून मिळणार आहे. २ नोव्हेंबरच्या मतदानानंतर ३ नोव्हेंबरला होणाऱ्या मतमोजणीत जिल्हा बँकेच्या सत्तेचा खरा फैसला होणार आहे.

समरसता साहित्य मंडळाचे उद्या कविसंमेलन

जनता आवाज वृत्तसेवा

श्रीरामपूर : तालुका समरसता साहित्य मंडळाच्या वतीने उद्या, दि. १ नोव्हेंबर रोजी दुपारी २ वाजता श्रीरामपूर मेनरोड येथील आगाशे सभागृहात कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाची माहिती उत्तर अहिल्यानगर जिल्हा संघचालक किशोर निर्मळ व साहित्यिक वसंतराव कदम यांनी दिली.

तालुक्यातील साहित्यिकांचे हे पहिलेच ऐतिहासिक प्रत्यक्ष स्नेहमिलन व परिचय मेळावा असल्याचे आयोजकांनी सांगितले.

आपली माणसं, आपले शब्द या भावनेतून आयोजित करण्यात आलेल्या या काव्यव्यासपीठावर सामाजिक समरसता, राष्ट्रभक्ती, सामाजिक एकोपा आणि साहित्याची समाजजोडणीतील भूमिका यावर विचारमंथन होणार आहे.

धर्म, जात, पंथ, वर्ग व विविध भेद विसरून समाजाने एकत्र येत सामाजिक समरसता निर्माण करण्याची गरज या माध्यमातून अधोरेखित करण्यात येणार आहे. सहभागी कवी-कवयित्री आपल्या स्वरचित कविता तसेच साहित्यविषयक चिंतन तीन ते पाच मिनिटांत सादर करणार आहेत.

समरसतेचा विचार, सामाजिक जाणीव आणि भविष्यातील विकासाची दिशा व्यक्त करणारे हे काव्यव्यासपीठ ठरणार असून, तालुक्यातील सर्व कवी-कवयित्री व साहित्यप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

सावेडी नाक्यावर फटाका मार्केट सुरू

आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते झाला शुभारंभ

जनता आवाज वृत्तसेवा

अहिल्यानगर : दिवाळीच्या पार्श्वभूमीवर फटाक्यांच्या खरेदीसाठी होणारी गर्दी लक्षात घेता नगर-मनमाड रोडवरील सावेडी नाका येथे नगर फटाका असोसिएशनच्या वतीने होलसेल फटाका मार्केट सुरू करण्यात आले आहे. आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते या मार्केटचा शुभारंभ करण्यात आला. या सुविधेमुळे अहिल्यानगर जिल्ह्यासह जिल्ह्यालगतच्या ग्रामीण भागातील नागरिकांना विविध प्रकारचे फटाके थेट घाऊक दरात खरेदी करण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे.

सावेडी नाका येथे प्रशस्त जागेत सुरू करण्यात आलेल्या या मार्केटमध्ये फटाका उत्पादक कंपन्यांचा माल थेट ग्राहकांपर्यंत उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्यामुळे मध्यस्थांचा खर्च कमी होऊन नागरिकांना तुलनेने माफक दरात फटाक्यांची खरेदी करता येणार आहे. दिवाळीच्या काळात शहरासह ग्रामीण भागातील नागरिकांची फटाके खरेदीसाठी होणारी गर्दी लक्षात घेऊन हे ठिकाण सोयीचे ठरणार आहे.

नगर फटाका असोसिएशनचे दीपक खेडकर म्हणाले की, ग्रामीण भागातील नागरिकांची गरज लक्षात घेऊन असोसिएशनच्या माध्यमातून सावेडी नाका येथे मागील अनेक वर्षांपासून होलसेल फटाका मार्केट सुरू आहे. दिवाळीच्या काळात नागरिकांना विविध प्रकारचे दर्जेदार फटाके घाऊक दरात उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जातो.

शुभारंभप्रसंगी नगरसेवक सुरेश बनसोडे, विकी जगताप, दीपक खेडकर, बाळासाहेब महामुनी, निलेश विळदकर, सनी घोरपडे, ऋत्विक शेठ, दरंदले बंधू, संकल्प राऊत, योगेश रोकडे, गोपाल बोरुडे, मंगेश सांगळे, कोतकर मेजर आदी उपस्थित होते.

> अहिल्यानगर शहर हे होलसेल फटाका मार्केटचे केंद्र बनत आहे. शहरात फटाके खरेदीसाठी ग्रामीण भागासह इतर जिल्ह्यांतूनही नागरिक येतात. त्यांना एकाच ठिकाणी विविध प्रकारचे फटाके उपलब्ध व्हावेत, यासाठी सावेडी नाका येथे हे मार्केट सुरू करण्यात आले आहे. उत्पादक कंपन्यांचा माल थेट ग्राहकांपर्यंत घाऊक दरात उपलब्ध होत असल्याने नागरिकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा.
>
> **– संग्राम जगताप, आमदार**

नितीन वाबळेंचा पॅरा स्विमिंगमध्ये डंका

जनता आवाज वृत्तसेवा

कोपरगाव : १८ व्या राज्यस्तरीय पॅरा स्विमिंग चॅम्पियनशिप २०२६ मध्ये कोपरगावचे नितीन किशोर वाबळे यांनी दमदार कामगिरी करत एक सुवर्ण आणि दोन कांस्य अशी तीन पदके पटकावली. त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे कोपरगावच्या क्रीडा क्षेत्राच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

पॅरालिम्पिक स्पोर्ट्स असोसिएशन (महाराष्ट्र) यांच्या वतीने ऑक्टोबर २०२६ मध्ये पुण्यातील श्री छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल, म्हाळुंगे-बालेवाडी येथील जलतरण तलावात या राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. राज्याच्या विविध भागांतून आलेल्या दिव्यांग जलतरणपटूंनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला.

नितीन वाबळे यांनी आपल्या उत्कृष्ट जलतरण कौशल्याची आणि जिद्दीची छाप पाडत ५० मीटर फ्रीस्टाइलमध्ये सुवर्णपदक पटकावले. त्याचबरोबर ५० मीटर बॅकस्ट्रोकमध्ये मेरिट कांस्यपदक, तर १०० मीटर फ्रीस्टाइलमध्ये कांस्यपदक मिळवत त्यांनी पदकांची हॅट्ट्रिक साधली.

नितीन वाबळे हे बँक ऑफ बडोदा येथे अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. नोकरीच्या जबाबदाऱ्या सांभाळतानाच त्यांनी जलतरणाचा सराव आणि स्पर्धांमधील सहभाग सातत्याने सुरू ठेवला. जिद्द, कठोर परिश्रम, आत्मविश्वास आणि सातत्यपूर्ण सरावाच्या जोरावर त्यांनी मिळविलेले हे यश विशेष कौतुकास्पद ठरले आहे.

त्यांच्या या यशाबद्दल क्रीडा क्षेत्रातील मान्यवर, मित्रपरिवार तसेच नागरिकांकडून अभिनंदन करण्यात येत आहे. दिव्यांगत्वावर मात करत क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या नितीन वाबळे यांची कामगिरी नवोदित खेळाडूंसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

बंद शिवपाणंद, शेतरस्ते मोकळे होणार

प्रकरणे निकाली काढण्याचे तहसीलदारांना आदेश

जनता आवाज वृत्तसेवा

अहिल्यानगर : जिल्ह्यात वर्षानुवर्षे बंद असलेले शिवपाणंद व शेतरस्ते खुले करण्याच्या मागणीला आता प्रशासनाच्या हालचालींमुळे वेग आला आहे. शेतकऱ्यांना त्यांच्या शेतापर्यंत जाण्यासाठी हक्काचे रस्ते उपलब्ध करून देणे, बंद रस्त्यांचे सीमांकन करणे आणि प्रलंबित प्रकरणांचा तातडीने निपटारा करण्यासाठी महसूल प्रशासनाने पावले उचलली आहेत. मिशन झिरो पेंडन्सी अंतर्गत शेतरस्त्यांशी संबंधित प्रकरणे प्राधान्याने निकाली काढण्याचे निर्देश जिल्हाधिकारी कार्यालयाच्या कुळकायदा शाखेमार्फत जिल्ह्यातील सर्व तहसीलदारांना देण्यात आले आहेत. त्यामुळे प्रशासनाच्या आदेशानंतर आता प्रत्यक्षात किती शेतरस्ते मोकळे होतात, याकडे जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

महाराष्ट्र राज्य शिवपाणंद रस्ता चळवळ समितीचे अध्यक्ष शरद भाऊसाहेब पवळे यांनी शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी जिल्हा प्रशासनाकडे निवेदन सादर केले होते. बंद शिवपाणंद व शेतरस्त्यांचा प्रश्न तातडीने मार्गी लावावा, जिल्हास्तरावर बैठक घेऊन ठोस कृती आराखडा तयार करावा, अशी मागणी समितीच्या वतीने करण्यात आली होती.

जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये अतिक्रमण, वहिवाटीचे वाद किंवा अन्य कारणांमुळे शिवपांदण व शेतरस्ते बंद झाल्याच्या तक्रारी आहेत. परिणामी शेतकऱ्यांना शेतीमालाची वाहतूक, मशागत, पेरणी, काढणी तसेच अन्य कृषी कामांसाठी मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

रस्ते प्रत्यक्ष मोकळे होणार?

प्रशासनाने हालचाली सुरू केल्या असल्या तरी केवळ पत्रव्यवहार आणि आदेशांपुरतीच कार्यवाही मर्यादित राहू नये, अशी शेतकऱ्यांची अपेक्षा आहे. प्रत्यक्ष मोजणी, हद्द निश्चिती, अतिक्रमण हटविणे आणि बंद रस्ते खुले करण्याची प्रक्रिया कालमर्यादेत पूर्ण झाली, तरच मिशन झिरो पेंडन्सीचा खरा परिणाम दिसून येणार आहे.

'मानसग्राम' ठरतेय आशेचा आधार

जनता आवाज वृत्तसेवा

अहिल्यानगर : बोटांच्या सूक्ष्म हालचालींचा सातत्याने वापर करून गंभीर मानसिक आजारांनी ग्रस्त रुग्णांच्या पुनर्वसनासाठी स्नेहालय संचलित मानसग्राम येथे अभिनव आणि वैज्ञानिक प्रयोग राबविण्यात येत आहे. एकत्रितपणे सक्रिय होणारे चेतापेशींचे जाळे अधिक मजबूत होते, या न्यूरोप्लास्टिसिटीच्या संकल्पनेवर आधारित या उपक्रमामुळे बायपोलर डिसऑर्डर आणि स्किझोफ्रेनियासारख्या आजारांनी त्रस्त रुग्णांमध्ये सकारात्मक बदल दिसून येत आहेत.

गेल्या वर्षी स्नेहाधारमधील एका महिलेवर क्रोशा विणण्याच्या उपक्रमाचा सकारात्मक परिणाम दिसून आल्यानंतर मानसग्रामच्या विश्वस्त मंडळाने २ जानेवारीपासून दररोज एक तास हा उपक्रम सुरू केला. रुग्णांना पारंपरिक शेवया, गव्हले, बोटवे, फणुले वळणे, मातीचे दागिने तयार करणे, क्ले वर्क तसेच चित्रकलेचे प्रशिक्षण देण्यात येते. जयश्री डावरे, दिपाली साळुंखे, अलका केळकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम सुरू आहे. या उपक्रमामुळे रुग्णांच्या एकाग्रतेसोबतच आत्मविश्वास आणि संवाद कौशल्यातही लक्षणीय वाढ झाल्याचे निरीक्षण नोंदविण्यात आले आहे. सोहम आणि सोना हे रुग्ण उपचार व पुनर्वसन प्रक्रियेनंतर पूर्णपणे बरे होऊन आपल्या घरी परतले आहेत. तर सविता ही महिला आता संगणकावर काम करण्यास सक्षम झाली आहे.

रुग्णांच्या दैनंदिन उपक्रमांसोबतच त्यांच्या मानसिक आरोग्यासाठी आयुर्वेद व्यासपीठाच्या सात महिला डॉक्टरांकडूनही सहकार्य केले जात आहे. या डॉक्टर दररोज रात्री दूरध्वनीवरून रुग्णांशी संवाद साधून त्यांना माइंडफुलनेस अर्थात सजगता आणि मानसिक स्थैर्याचे धडे देतात. रुग्णांचे औषधांवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी आणि त्यांना दैनंदिन जीवनात अधिक सक्षम करण्यासाठी विविध पातळ्यांवर प्रयत्न सुरू आहेत.

पारनेरमध्ये मनसेची गांधीगिरी

सडलेल्या धान्याच्या निषेधार्थ तहसीलदारांना भरविला पुलाव

जनता आवाज वृत्तसेवा

पारनेर : सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत दिवाळीच्या काळात गोरगरीब लाभार्थ्यांना अळ्या, सोंडे व जाळ्या लागलेले, कुबट वास येणारे तसेच सडलेले धान्य वितरित केल्याचा आरोप करत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने गुरुवारी (दि. २९) पारनेर तहसील कार्यालयासमोर अनोख्या पद्धतीने आंदोलन केले. मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी चांगल्या प्रतीच्या तांदळापासून तयार केलेला पुलाव तहसीलदारांसह संबंधित अधिकाऱ्यांना सन्मानपूर्वक खाऊ घालत गांधीगिरीच्या माध्यमातून प्रशासनाचे लक्ष वेधले.

पारनेर तालुक्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेतून दिवाळीच्या काळात लाभार्थ्यांना निकृष्ट दर्जाचे धान्य मिळत असल्याच्या तक्रारी मनसेने यापूर्वीही केल्या होत्या. तांदूळ, गहू आणि ज्वारीच्या गुणवत्तेबाबत गंभीर आरोप करत प्रशासनाला निवेदन देण्यात आले होते. मात्र, या प्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी मनसेने आंदोलनाची वेगळी वाट निवडली.

तहसीलदार या महिला अधिकारी असल्याने त्यांच्या पदाचा तसेच स्त्रीशक्तीचा सन्मान राखत आक्रमक पद्धतीऐवजी गांधीगिरीच्या मार्गाने आंदोलन करण्याचा निर्णय घेतल्याचे मनसे पदाधिकाऱ्यांनी सांगितले. त्यानुसार चांगल्या प्रतीच्या तांदळापासून खमंग पुलाव तयार करून तहसीलदार गायत्री सौंदाणे, पुरवठा अधिकारी प्रविण वाढाई आणि पारनेर पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक सोमनाथ दिवटे यांना पुलाव खाऊ घालण्यात आला. संबंधित अधिकाऱ्यांनीही मनसेचे हे आमंत्रण स्वीकारले.

मनसेचे तालुकाप्रमुख अविनाश मुरलीधर पवार यांनी प्रशासनाला दिलेल्या निवेदनातून धान्याच्या गुणवत्तेचा मुद्दा उपस्थित केला. गरिबांच्या ताटात काय जाते, याचा प्रत्यक्ष अनुभव घ्या. लाभार्थ्यांना चांगल्या दर्जाचे धान्य मिळेल, यासाठी प्रशासनाने ठोस पावले उचलावीत, अशी मागणी त्यांनी केली. तहसील कार्यालयासमोर दुपारी एकच्या सुमारास झालेल्या या अनोख्या आंदोलनामुळे पारनेरमध्ये सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील धान्याच्या गुणवत्तेचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला असून, प्रशासन या तक्रारींवर काय कार्यवाही करते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

खराब धान्य तक्रारींची चौकशी करा

सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील धान्याची गुणवत्ता, साठवणूक आणि लाभार्थ्यांना होणारे वितरण यांची गांभीर्याने तपासणी करावी, निकृष्ट अथवा खराब धान्य वितरित होत असल्याच्या तक्रारींची चौकशी करावी आणि तक्रारींमध्ये तथ्य आढळल्यास संबंधितांची जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी मनसेने केली.

शाळेच्या आठवणींनी फुलला स्नेहमेळावा

जनता आवाज वृत्तसेवा

श्रीरामपूर : तालुक्यातील नायगाव जुने येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत माजी विद्यार्थी मेळावा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. अनेक वर्षांनंतर एकत्र आलेल्या माजी विद्यार्थ्यांनी जुन्या आठवणींना उजाळा देत शाळा आणि शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. या मेळाव्यामुळे माजी विद्यार्थी व शिक्षकांमधील जिव्हाळ्याचे नाते पुन्हा दृढ झाले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी माजी विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी माजी विद्यार्थ्यांनी आपल्या शालेय जीवनातील आठवणी आणि अनुभव कथन केले. शाळेने दिलेले संस्कार, शिक्षकांचे मार्गदर्शन तसेच विविध शालेय उपक्रमांमुळे जीवनाला योग्य दिशा मिळाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. महेश लांडे यांनी मैत्रीविषयक स्वरचित कविता सादर करून उपस्थितांची दाद मिळवली.

मेळाव्यात माजी विद्यार्थ्यांच्या संघाची स्थापना करण्यात आली. संघाच्या अध्यक्षपदी प्रविण बोर्डे, उपाध्यक्षपदी सागर नजन, कोषाध्यक्षपदी अविनाश राशीनकर, तर सचिवपदी शाकीर शेख यांची निवड करण्यात आली. शैक्षणिक सल्लागार सदस्य म्हणून रेहाना मुजावर शेख, ॲड. संदीप लांडे, डॉ. प्रकल्प राशीनकर आणि डॉ. संदीप लांडे यांची निवड झाली.

माजी विद्यार्थी संघाच्या सदस्यपदी महेश लांडे, सतीश लांडे, किरणकुमार लांडे, सागर लांडे, गोरख राशीनकर, नवनाथ राशीनकर व सोमनाथ राशीनकर यांची निवड करण्यात आली. नूतन कार्यकारिणीचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमासाठी महेश लांडे, सागर नजन, किरणकुमार लांडे, अविनाश राशीनकर, प्रकल्प राशीनकर, प्रविण बोर्डे, गोरख राशीनकर, नवनाथ राशीनकर आदी उपस्थित होते.

शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील

आ. अक्षय कर्डिले यांची ग्वाही; जिल्हा बँकेच्या संचालकपदी निवडीबद्दल सत्कार

जनता आवाज वृत्तसेवा

राहुरी : सर्वसामान्य शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी तसेच त्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या माध्यमातून प्रामाणिकपणे प्रयत्न करणार असल्याची ग्वाही आ. अक्षय कर्डिले यांनी दिली.

अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालकपदी निवड झाल्याबद्दल राहुरी येथील जनसंपर्क कार्यालयात कार्यकर्त्यांच्या वतीने आ. कर्डिले यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.

यावेळी राहुरीचे माजी उपनगराध्यक्ष रावसाहेब तनपुरे, भाजपचे जिल्हा सरचिटणीस अमोल भनगडे, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य अनिल आढाव, भाजपचे तालुका मंडल अध्यक्ष युवराज गाडे, धनंजय आढाव, राजेंद्र गोपाळे, जिल्हा चिटणीस रवींद्र म्हसे, उमेश शेळके, कुलदीप पवार, नगरसेवक नयन शिंगी, माजी नगरसेवक सुनील पवार, जब्बार पठाण, सतीश फुलसौंदर यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

> शेतकरी हा सहकार व्यवस्थेचा केंद्रबिंदू आहे. जिल्हा बँकेच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या अडचणी सोडविणे, त्यांना आर्थिक मदत मिळवून देणे तसेच आवश्यक सहकार्य उपलब्ध करून देण्यासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील राहणार आहोत. शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य देऊन बँकेच्या माध्यमातून प्रभावी काम करण्याचा प्रयत्न राहणार आहे.
>
> **– अक्षय कर्डिले, आमदार**

ब्राह्मणीतील मृत्यू प्रकरणाला कलाटणी

जनता आवाज वृत्तसेवा

अहिल्यानगर : ब्राह्मणी येथील विलास परसराम मोकाटे या तरुणाच्या मृत्यू प्रकरणाने राहुरी तालुक्यात खळबळ उडाली होती. या प्रकरणातील आरोपींना अटक करण्यासाठी नातेवाइकांनी आक्रमक भूमिका घेत मृतदेह थेट पोलीस ठाण्यात आणून अंत्यविधी करण्याचा पवित्रा घेतला होता. या पार्श्वभूमीवर राहुरी पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत प्रकरणातील तिसऱ्या आरोपीला सोनई पोलीस ठाण्याच्या हद्दीतून अटक केली. विनोद विजय वाघमारे असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे.

विलास मोकाटे यांना मारहाण झाल्यानंतर त्यांच्यावर उपचार सुरू होते. मात्र, उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. सुरुवातीला या प्रकरणी अक्षय कैलास मोकाटे, विकास सुखदेव गुजर, भाऊसाहेब विल्यम साठे आणि विनोद विजय वाघमारे या चौघांविरुद्ध राहुरी पोलीस ठाण्यात मारहाणीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. विलास मोकाटे यांचा मृत्यू झाल्यानंतर पोलिसांनी गुन्ह्यात खुनाचे वाढीव कलम समाविष्ट केले.

दरम्यान, आरोपींना अटक होत नसल्याने संतप्त नातेवाइकांनी मृतदेह पोलीस ठाण्यात आणण्याचा पवित्रा घेतला होता. त्यामुळे पोलीस प्रशासनाची मोठी धावपळ उडाली. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेत पोलिसांनी नातेवाइकांशी चर्चा करून आरोपींना लवकरच अटक करण्याचे आश्वासन दिले. यानंतर पोलिसांनी आरोपींचा शोध घेण्यासाठी तपासाची चक्रे गतिमान केली. विनोद वाघमारे हा सोनई पोलीस ठाण्याच्या हद्दीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार राहुरी पोलिसांच्या पथकाने सापळा रचून त्याला शिताफीने ताब्यात घेतले. या कारवाईमुळे प्रकरणातील तिसऱ्या आरोपीला अटक करण्यात पोलिसांना यश आले आहे.

ही कारवाई पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक मनोज अहिरे, प्रमोद ढाकणे, प्रवीण बागुल, नदीम शेख, सूरज गायकवाड, राहुल यादव, वंदना पवार यांच्या पथकाने केली.

विकासासाठी ३२ हजार झाडांचा बळी?

कर्जतच्या जलविद्युत प्रकल्पावरून राज्यात पर्यावरण विरुद्ध विकासाची नवी लढाई; सरकार ठाम, पर्यावरणप्रेमी आक्रमक

कर्जत येथे ३ हजार मेगावॉटचा पंप्ड स्टोरेज प्रकल्प
प्रकल्पाची किंमत : १३,हजार५०५ कोटी रुपये
३२ हजारांहून अधिक झाडे तोडण्यास मंजुरी
सरकारचा दावा : ऊर्जा सुरक्षा, गुंतवणूक आणि रोजगार
पर्यावरणप्रेमींचा आक्षेप : जंगल, जैवविविधता आणि वनहक्क धोक्यात
आरेनंतर पुन्हा विकास विरुद्ध पर्यावरणाचा संघर्ष ऐरणीवर

जनता आवाज वृत्तसेवा

श्रीरामपूर : महाराष्ट्राच्या वाढत्या विजेच्या गरजा भागविण्यासाठी रायगड जिल्ह्यातील कर्जत येथे उभारण्यात येणाऱ्या टोरंट पॉवरच्या तीन हजार मेगावॉट क्षमतेच्या पंप्ड स्टोरेज जलविद्युत प्रकल्पासाठी ३२ हजारांहून अधिक झाडे तोडण्याचा निर्णय राज्यात नव्या वादाला तोंड फोडत आहे. एकीकडे सरकार हा प्रकल्प ऊर्जा सुरक्षेसाठी अत्यावश्यक असल्याचा दावा करत असताना, दुसरीकडे जंगलांचा ऱ्हास, जैवविविधतेचे नुकसान आणि आदिवासींच्या उपजीविकेवर होणाऱ्या परिणामांबाबत पर्यावरणप्रेमींनी तीव्र आक्षेप नोंदविला आहे.

सुमारे १३ हजार ५०५ कोटी रुपयांच्या या प्रकल्पासाठी आवश्यक वनपरवानग्या मिळाल्या असल्या, तरी हजारो प्रौढ वृक्षांची होणारी कत्तल हा राज्यातील पर्यावरणीय धोरणाचा गंभीर प्रश्न ठरत आहे. स्वच्छ ऊर्जेच्या नावाखाली जंगलांचे नुकसान कितपत स्वीकारायचे, हा मुद्दा आता केवळ एका प्रकल्पापुरता मर्यादित राहिलेला नाही.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रकल्पाचे समर्थन करत, राज्याच्या वाढत्या ऊर्जा गरजा आणि अक्षय ऊर्जेच्या साठवणुकीसाठी पंप्ड स्टोरेज प्रकल्प अपरिहार्य असल्याचे स्पष्ट केले आहे. या प्रकल्पातून मोठी गुंतवणूक आणि रोजगारनिर्मिती होणार असल्याचाही सरकारचा दावा आहे.

मात्र पर्यावरणप्रेमींचे म्हणणे वेगळे आहे. जंगलातील मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या वृक्षतोडीमुळे वन्यजीवांचे अधिवास, स्थानिक जलस्रोत, मातीचे संरक्षण आणि पर्यावरणीय समतोल धोक्यात येईल, अशी त्यांची भीती आहे. कर्जत परिसरातील आदिवासी समाजाच्या वनहक्कांचाही प्रश्न या निमित्ताने पुढे आला आहे.

या मुद्द्यावरून राज्यातील राजकारणही तापले आहे. आदित्य ठाकरे, रोहित पवार आणि राज ठाकरे यांनी वृक्षतोडीवर प्रश्न उपस्थित करत पर्यावरणीय निर्णयप्रक्रियेत अधिक पारदर्शकतेची मागणी केली आहे. अभिनेते व पर्यावरणप्रेमी सयाजी शिंदे यांनीही जुन्या वृक्षांचे संवर्धन करत विकासाचे पर्याय शोधण्याची गरज अधोरेखित केली आहे.

मुंबईतील आरे कारशेड वादानंतर पुन्हा एकदा विकास आणि पर्यावरण यांच्यातील समतोलाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. रस्ते, मेट्रो, उद्योग आणि वीज प्रकल्पांची गरज मान्य असली, तरी त्यासाठी हजारो झाडांचा बळी देण्यावाचून पर्याय नाही का, असा प्रश्न आता अधिक तीव्रतेने विचारला जात आहे.

सायबर पोलिसांचा 'मोबाईल शोध'!

देशभरातून आठ हरवलेले स्मार्टफोन हस्तगत; अडीच लाखांचा मुद्देमाल मूळ मालकांच्या ताब्यात

हरवलेले मोबाईल हस्तगत : ८
अंदाजे किंमत : २ ते २.५ लाख
शोध क्षेत्र : महाराष्ट्रासह देशातील विविध राज्ये
कारवाई : तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे शोध व पुनर्प्राप्ती.

जनता आवाज वृत्तसेवा

अहिल्यानगर : मोबाईल हरवल्यानंतर तो परत मिळण्याची आशा मावळलेल्या नागरिकांना अहिल्यानगर सायबर पोलिसांनी दिलासा दिला आहे. तांत्रिक कौशल्याच्या आधारे भारतातील विविध राज्यांत शोध घेत सायबर पोलिसांनी आठ हरवलेले स्मार्टफोन हस्तगत केले असून, ते कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून मूळ मालकांच्या ताब्यात देण्यात आले आहेत. या मोबाईलची अंदाजे किंमत दोन ते अडीच लाख रुपये आहे.

नागरिकांचे गहाळ झालेले व हरवलेले मोबाईल शोधण्यासाठी सायबर पोलीस ठाण्याकडून विशेष तांत्रिक मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेत तांत्रिक पथकाने मोबाईलच्या वापरासंदर्भातील माहितीचे विश्लेषण करून विविध राज्यांमध्ये सक्रिय असलेल्या उपकरणांचा माग काढला. त्यातून आठ स्मार्टफोन शोधून काढण्यात पोलिसांना यश आले.

हस्तगत केलेले मोबाईल सायबर पोलीस ठाण्यात संबंधित तक्रारदारांना बोलावून, मालकीची पडताळणी व आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर परत करण्यात आले. हरवलेला मोबाईल पुन्हा मिळाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त करत पोलिसांच्या तत्परतेचे कौतुक केले.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन आणि अपर पोलीस अधीक्षक वैभव कलूबर्मे यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस ठाण्याच्या अधिकारी व अंमलदारांच्या पथकाने केली.

दुष्काळात मायक्रो फायनान्सच्या वसुलीचा तगादा थांबवा

कर्जफेडीस मुदतवाढ, व्याजमाफीची बाळासाहेब तोरणे यांची मागणी

जनता आवाज वृत्तसेवा

श्रीरामपूर : दुष्काळामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था संकटात असताना मायक्रो फायनान्स कंपन्यांकडून बचत गटातील महिला व कर्जदारांकडे सुरू असलेला वसुलीचा तगादा तातडीने थांबवावा, अशी मागणी पंचायत समितीचे माजी सभापती बाळासाहेब तोरणे यांनी केली आहे. शासनाने दुष्काळी परिस्थितीत कर्जवसुलीला लगाम घालण्याचे निर्देश दिले असतानाही काही कंपन्यांकडून सक्तीची वसुली सुरू असल्याचा आरोप त्यांनी केला.

यंदाच्या खरीप हंगामात पावसाअभावी बाजरी, सोयाबीन, कापूस, कांदा यांसह विविध पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतीतून उत्पन्न नाही, मजुरांच्या हाताला काम नाही आणि रब्बी हंगामाचीही शाश्वती नाही, अशा परिस्थितीत कर्जाच्या हप्त्यांसाठी दबाव आणणे योग्य नसल्याचे तोरणे यांनी सांगितले.

मायक्रो फायनान्स कंपन्यांचे कर्मचारी बचत गटातील महिलांकडे हप्त्यांसाठी वारंवार पाठपुरावा करत असून, काही ठिकाणी धमकीच्या स्वरूपात वसुली केली जात असल्याचा आरोप त्यांनी केला. कर्जाचा हप्ता न भरल्यास कर्जातून घेतलेल्या वस्तू किंवा जनावरे जप्त करण्याची भाषा केली जात असल्याचेही त्यांनी सांगितले.

दिवाळीतही हप्त्यांचा दबाव

दिवाळीचा सण १२ नोव्हेंबरला असताना काही महिलांच्या कर्जहप्त्याची तारीख १२ तारखेला आहे. मात्र, फायनान्स कंपन्यांकडून ६ नोव्हेंबरपर्यंत हप्ता भरण्याची सक्ती केली जात असल्याचे तोरणे यांनी म्हटले आहे. सणासुदीच्या काळात आर्थिक अडचणीत असलेल्या महिलांवरील हा दबाव थांबविण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कर्जाला मुदतवाढ, व्याज आकारणी थांबविण्याची मागणी

ग्रामपातळीवर सरपंच आणि प्रशासकांनी मायक्रो फायनान्स कंपन्यांना दुष्काळी परिस्थितीत वसुली न करण्याबाबत सूचना द्याव्यात. तसेच बचत गटातील महिला व अन्य कर्जदारांना कर्जफेडीसाठी मुदतवाढ द्यावी आणि दुष्काळाच्या कालावधीत कर्जावर व्याज आकारू नये, अशी मागणी तोरणे यांनी केली आहे.

भीमा नदीवरील बंधाऱ्यांत पाणी सोडा; पाचपुतेंची मागणी

जनता आवाज वृत्तसेवा

लिंपणगाव : श्रीगोंदा-नगर विधानसभा मतदारसंघातील दुष्काळसदृश परिस्थिती लक्षात घेता भीमा नदीवरील बंधाऱ्यांमध्ये तातडीने पाणी सोडावे, अशी मागणी आमदार विक्रमसिंह बबनराव पाचपुते यांनी केली. पुणे येथील विभागीय आयुक्त कार्यालयात झालेल्या कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत त्यांनी मतदारसंघातील पाणीप्रश्न मांडला.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली. बैठकीत पिण्याच्या पाण्यासह शेती सिंचनासाठी उपलब्ध पाण्याचे नियोजन आणि विविध पाणीविषयक प्रश्नांवर चर्चा झाली.

यावेळी आमदार पाचपुते यांनी श्रीगोंदा-नगर मतदारसंघातील शेतकऱ्यांना भेडसावत असलेल्या पाणीटंचाईकडे लक्ष वेधले. सध्या निर्माण झालेली दुष्काळसदृश स्थिती, शेतीसाठी वाढलेली पाण्याची गरज आणि उभ्या पिकांवरील संकट पाहता भीमा नदीवरील बंधाऱ्यांमध्ये पाणी सोडणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. बंधाऱ्यांमध्ये पाणी उपलब्ध झाल्यास परिसरातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी मोठा दिलासा मिळेल. तसेच अनेक गावांतील पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही काही प्रमाणात कमी होण्यास मदत होईल, अशी भूमिका त्यांनी मांडली.

या मागणीची दखल घेत संबंधित अधिकारी लवकरच प्रत्यक्ष पाहणी करणार असून, त्यानंतर बंधाऱ्यांमध्ये पाणी सोडण्याबाबत निर्णय घेण्यात येणार असल्याचे बैठकीत सांगण्यात आले.

बागायतीला जिरायतीचा दर; शेतकऱ्यांनी नाकारली नुकसानभरपाई

सूरत-चेन्नई महामार्ग भूसंपादनाला विरोध; जमीन व ॲसेटची रक्कम एकत्र देण्याची मागणी

जनता आवाज वृत्तसेवा

श्रीरामपूर : बागायती शेतजमिनीला जिरायतीचा दर लावून नुकसानभरपाई दिली जात असल्याचा आरोप करत राहुरी तालुक्यातील सोनगावसह पाच गावांतील शेतकऱ्यांनी सूरत-चेन्नई महामार्गाच्या भूसंपादनाची रक्कम नाकारली. "बाजारभावापेक्षा कमी दराने जमीन घेऊन शेतकऱ्यांचे संसार उद्ध्वस्त करणारा विकास नको," असा संताप व्यक्त करत शेतकऱ्यांनी श्रीरामपूर येथील प्रांताधिकारी किरण सावंत यांना निवेदन दिले.

बागायती जमिनीचा दर सुमारे ५० लाख रुपये एकर असताना रेडी रेकनरच्या आधारे २३ लाख रुपये एकरप्रमाणे नुकसानभरपाई निश्चित करण्यात आल्याचा शेतकऱ्यांचा आरोप आहे. तसेच जमीन आणि जमिनीवरील ॲसेट (घर, गोठा, विहीर, फळबागा, शेड) यांची नुकसानभरपाई एकत्र देण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. सूरत-चेन्नई महामार्गासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने नोव्हेंबर २०२१ मध्ये अधिसूचना काढली होती. त्यानंतर संबंधित विभागांनी जमिनीचे तसेच त्यावरील मालमत्तांचे मूल्यांकन केले. कृषी, महसूल, बांधकाम आणि वन विभागांनी केलेल्या मूल्यांकनाची प्रांत कार्यालयाने तपासणी केली. मात्र, २०२४ मध्ये भारतमाला योजनेअंतर्गत हा प्रकल्प रखडला. या काळात जमिनीवर महामार्गाचा फेर पडल्याने कर्ज मिळणे आणि खरेदी-विक्री करणे शेतकऱ्यांना अडचणीचे ठरले.

प्रकल्पाला पुन्हा गती मिळाल्यानंतर भूसंपादनाची प्रक्रिया सुरू झाली. मात्र, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने आधी केवळ जमिनीची रक्कम देऊन ॲसेटची रक्कम नंतर देण्याची भूमिका घेतल्याने शेतकरी आक्रमक झाले आहेत. महामार्ग संघर्ष समितीचे अध्यक्ष लक्ष्मणराव अंत्रे म्हणाले, "मूल्यांकन करण्यासाठी केंद्र सरकारनेच प्रांतांची नियुक्ती केली होती. आता त्यांचेच मूल्यांकन मान्य केले जात नाही. जमिनीवरील घर, गोठे, झाडे, विहिरी यांचे मूल्यांकन झाले असतानाही त्याची रक्कम देण्यास टाळाटाळ केली जात आहे." "जमिनीचे पैसे मिळण्यासाठी सहा वर्षे लागली. आता ॲसेटच्या रकमेसाठी आणखी किती वर्षे प्रतीक्षा करायची?" असा सवाल त्यांनी केला.

गणेश अंत्रे म्हणाले, "२३ लाख रुपये एकर दराने बागायती जमीन देण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. सरकारला विकास करायचा असेल तर शेतकऱ्यांच्या हक्काचा मोबदला द्यावा. शेतकऱ्यांच्या मुंडक्यावर पाय देऊन विकास होऊ देणार नाही."

'या पैशांपेक्षा विष द्या'

आंदोलनात सहभागी झालेल्या निर्मला तुळशीराम अनाप यांनी नुकसानभरपाईच्या रकमेतून होणाऱ्या नुकसानीची व्यथा मांडली. "पतीचे निधन झाले आहे. माझी ३९ गुंठे शेती असून त्यातील सात गुंठे रस्त्यात जात आहेत. बोअर, विहीर आणि सायफनही जाणार आहेत. त्यासाठी अवघी चार लाखांची भरपाई मिळत आहे. मुलांच्या शिक्षणासाठी मजुरी करून संसार चालवते. विहीर आणि बोअर गेल्यावर शेती कशी करायची?" असा सवाल करताना त्यांच्या डोळ्यांत अश्रू आले. या वेळी सोनगावसह सात्रळ, कानडगाव, कनगर, वांबोरी आदी गावांतील शेकडो शेतकरी यावेळी उपस्थित होते.

शेतकऱ्यांच्या मागण्या

जमीन व ॲसेटची नुकसानभरपाई एकत्र द्यावी.
बाजारभावानुसार जमिनीचा मोबदला द्यावा.
प्रांत कार्यालयाने केलेले ॲसेटचे मूल्यांकन मान्य करावे.
महिनाभरात नुकसानभरपाई द्यावी; अन्यथा महामार्गाचा मार्ग बदलावा.

'शेतकरी उद्ध्वस्त करणारा विकास काय कामाचा?'

"रस्ते विकास देशाच्या हिताचा आहे म्हणून आम्ही आतापर्यंत सहकार्य केले. मात्र, शेतकरी उद्ध्वस्त करणारे नियम आणि कारभार मान्य नाही. शेतकऱ्यांच्या घरादारावर नांगर फिरवून होणारा विकास काय कामाचा?"

लक्ष्मण अंत्रे, अध्यक्ष, महामार्ग संघर्ष समिती

भेंड्याच्या ऋतुजाची वैद्यकीय क्षेत्रात झेप

जनता आवाज वृत्तसेवा

भेंडा : नेवासा तालुक्यातील भेंडा बुद्रुक येथील कु. ऋतुजा विश्वनाथ मिसाळ हिने वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. एमबीबीएस पदवीनंतर तिने एमडी रेडिओलॉजी ही पदव्युत्तर पदवी यशस्वीरीत्या पूर्ण केली असून, तिच्या यशाने भेंडा गावाच्या नावलौकिकात भर पडली आहे.

ऋतुजाने बारावी विज्ञान शाखेची परीक्षा गुणवत्तेच्या जोरावर उत्तीर्ण झाल्यानंतर पुणे येथील बी. जे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून एमबीबीएसची पदवी संपादन केली. त्यानंतर तिने नांदेड येथील डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात एमडी रेडिओलॉजीचे शिक्षण पूर्ण केले.

वैद्यकीय क्षेत्रातील उच्च शिक्षणाची वाटचाल करताना ऋतुजाने सातत्य, मेहनत आणि गुणवत्तेच्या जोरावर हे यश मिळविले. ग्रामीण भागातून वैद्यकीय क्षेत्रात यशस्वी वाटचाल करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी तिचे यश प्रेरणादायी ठरत आहे. ऋतुजाच्या या यशात आई सौ. राणी मिसाळ, वडील डॉ. विश्वनाथ मिसाळ, मावशी प्राथमिक शिक्षिका मनीषा धनापुणे, काका मुख्याध्यापक कैलास धनापुणे तसेच विष्णू मिसाळ यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

ग्रामपंचायत नोंदीसाठी १.२५ लाखांची लाच मागितली

अधिकाऱ्यावर गुन्हा

जनता आवाज वृत्तसेवा

अहिल्यानगर : खरेदी दस्त आणि संमतीपत्राची ग्रामपंचायत दप्तरी नोंद करण्यासाठी एक लाख २५ हजार रुपयांची लाच मागितल्याप्रकरणी श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी व कोळगाव ग्रामपंचायतीचे ग्रामपंचायत अधिकारी शरद साहेबराव कवडे (वय ५३) यांच्याविरुद्ध बेलवंडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) ही कारवाई केली.

तक्रारदाराच्या वडिलांनी काष्टी येथील सिटी सर्व्हे क्रमांक १८१ मधील ४०.३५ चौ.मी. बांधकाम व वखळ जागा खरेदी केली होती. या व्यवहाराची नोंदणी श्रीगोंदा येथील दुय्यम निबंधक कार्यालयात दस्त क्रमांक ३५९८/२०२६ अन्वये करण्यात आली होती. तसेच काष्टी ग्रामपंचायतीच्या मालकीची १२ बाय १२ फुटांची (१४४ चौ.फुट) जागा भाडे तत्त्वावर वापरासाठी देण्यात आली होती. या जागेची ग्रामपंचायत नमुना क्रमांक ११ मध्ये नोंद करण्यास हरकत नसल्याचे संमतीपत्रही देण्यात आले होते. या कागदपत्रांची ग्रामपंचायत दप्तरी नोंद करण्यासाठी ग्रामपंचायत अधिकारी कवडे यांनी तक्रारदाराकडे एक लाख २५ हजार रुपयांची मागणी केली. मात्र, लाच देण्याची इच्छा नसल्याने तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली.तक्रारीची पडताळणी १४ ऑक्टोबर २०२६ रोजी कोळगाव येथील हॉटेल स्वाद येथे करण्यात आली. त्यावेळी पंचासमक्ष ग्रामपंचायत अधिकारी कवडे यांनी तक्रारदाराकडे एक लाख २५ हजार रुपयांची लाच मागितल्याचे निष्पन्न झाले.

महामार्गावर दरोड्याचा कट उधळला; मोक्कातील चार फरार आरोपी जेरबंद

नगर-पुणे महामार्गावरील कारवाई; तीन लाखांचा मुद्देमाल जप्त, सहा साथीदार पसार

जनता आवाज वृत्तसेवा

अहिल्यानगर : नगर-पुणे महामार्गावर वाहनचालकांना अडवून दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या टोळीवर स्थानिक गुन्हे शाखेने धाड टाकत मोक्का गुन्ह्यातील चार फरार आरोपींना अटक केली. या कारवाईत तीन मोटारसायकली, दोन चाकू, गलोर, टायटन कंपनीचे घड्याळ असा ३ लाख २ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, टोळीतील अन्य सहा आरोपी पसार झाले आहेत.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार दरोडा प्रतिबंधक गस्त सुरू असताना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला २९ ऑक्टोबर रोजी गोपनीय माहिती मिळाली. नगर-पुणे महामार्गावरील चास घाट परिसरात भारतीय सैन्य दलाच्या 'वाय' आकाराच्या चिन्हाजवळ ८ ते १० जण धारदार शस्त्रे व गलोर घेऊन वाहनचालकांना लुटण्याच्या तयारीत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी तत्काळ सापळा रचला.

पोलिसांची चाहूल लागताच संशयितांनी पळ काढण्याचा प्रयत्न केला. मात्र पाठलाग करून सुशांत सुरेश भोसले (रा. पिंपळगाव कवडा),

वैभव किरण भोसले (रा. धानोरा, जि. बीड), अविनाश सावंत ऊर्फ सावत्या भोसले (रा. पिंपळगाव कवडा) आणि राम ऊर्फ बोकड्या ऊर्फ बठ्या लखन काळे (रा. कामरगाव) यांना ताब्यात घेण्यात आले. चौकशीत जाक्या संजय काळे, आवेश मिरफा भोसले, जयपाल संजय काळे, प्रथमेश मिरफा भोसले, परमेश मिरफा भोसले आणि तुषार सावत्या भोसले हे साथीदार पसार झाल्याचे निष्पन्न झाले.

चौकशीत सुशांत भोसले याने साथीदारांसह यापूर्वी चास-कामरगाव घाट परिसरात नगर-पुणे महामार्गावरील पाच ते सहा वाहनचालकांना अडवून मारहाण करत चोरी केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. या माहितीच्या आधारे जुन्या गुन्ह्यांची पडताळणी करून आणखी गुन्हे उघडकीस आणण्याचे काम सुरू आहे.

या प्रकरणी नगर तालुका पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१० (४), ३१० (५), ३१० (६), ३१३ तसेच शस्त्र कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विशेष म्हणजे, अटक करण्यात आलेल्या आरोपींपैकी सुशांत भोसले, अविनाश ऊर्फ सावत्या भोसले, राम ऊर्फ बोकड्या काळे आणि फरार तुषार सावत्या भोसले हे सुपा पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या महाराष्ट्र संघटित गुन्हेगार प्रतिबंधक (मोक्का) कायद्याअंतर्गत गुन्ह्यातही फरार असल्याचे तपासात समोर आले आहे. अटक आरोपींवर यापूर्वी दरोडा, जबरी चोरी, खुनाचा प्रयत्न, घरफोडी, शस्त्र बाळगणे आदी गंभीर स्वरूपाचे अनेक गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे, सहाय्यक पोलीस निरीक्षक हरीष भोये तसेच शाहीद शेख, अरुण गांगुर्डे, अतुल लोटके, वंदना मोढवे, योगेश भिंगारदिवे, शामसुंदर जाधव, अमोल आजबे, प्रकाश मांडगे, सागर ससाणे, रोहित येमुल, अमोल कोतकर, भाऊसाहेब काळे, मनोज साखरे आणि अरुण मोरे यांच्या पथकाने केली.

जावक क्रमांक /२०५१/२०२६
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
२रा मजला, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत,
आकाशवाणी समोर, सावेडी, अहिल्यानगर
दिनांक : २८/१०/२०२६

कार्यालयाचा पत्ता
धर्मादाय उप आयुक्त,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
दुसरा मजला,मध्यवर्ती प्रशासकीय इमारत,
आकारशवाणी समोर, सावेडी,
अहिल्यानगर-४१४००३.

सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नोंदणी कार्यालय, अहिल्यानगर विभाग, अहिल्यानगर

जाहीर नोटीस

(महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ नियम ७ व ७अे वाचावे)

बदल अहवाल क्रमांक: DYCC /४९/२०२६

ज्याअर्थी, देवनाथ फाउंडेशन खरवंडी (कासार), ता. पाथर्डी जि. अहिल्यानगर, न्यास नोंदणी क्र. एफ. १८७२० (अहिल्यानगर) या सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेचा सादरकर्ता श्री. डॉ. ज्ञानेश्वर नारायण दराडे यांनी बदल अर्ज चौकशी क्रमांक ४९/२०२६ यामध्ये बदला करिता उपरोक्त बदल अहवाल सादर केलेला आहे व तो मा. धर्मादाय उप आयुक्त यांनी दिनांक १२/०१/२०२६ रोजी तात्पुरता स्विकृत केलेला आहे, त्याअर्थी, हितसंबंध असलेल्या सर्व संबंधीत लोकांना सदर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, सदर बदल अहवालास आपणास काही आक्षेप / हरकत घ्यावयाची असल्यास, आपण आपली हरकत सदर जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत मा. धर्मादाय उपआयुक्त यांचेसमोर दाखल करावी, अन्यथा, सदर बदल अहवालास आपली काहीही हरकत नाही, असे समजून सदर बदल अर्जावरती दिनांक ३०/११/२०२६ रोजी अंतिम आदेश करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २७ रोजी माहे १० सन २०२६ माझ्या सहीनिशी व धर्मादाय आयुक्तांच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
वरिष्ठ लिपिक

शिक्का

सही/-
अधिक्षक (न्याय),
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अहिल्यानगर विभाग, अहिल्यानगर.

जावक क्रमांक / ४०५०/२०२६
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
२रा मजला, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत,
आकाशवाणी समोर, सावेडी, अहिल्यानगर
दिनांक : २८/१०/२०२६

कार्यालयाचा पत्ता
धर्मादाय उप आयुक्त,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
दुसरा मजला,मध्यवर्ती प्रशासकीय इमारत,
आकारशवाणी समोर, सावेडी,
अहिल्यानगर-४१४००३.

सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नोंदणी कार्यालय, अहिल्यानगर विभाग, अहिल्यानगर

जाहीर नोटीस

(महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ नियम ७ व ७अे वाचावे)

बदल अहवाल क्रमांक: DYCC /५०/२०२६

ज्याअर्थी, देवनाथ फाउंडेशन खरवंडी (कासार), ता. पाथर्डी जि. अहिल्यानगर, न्यास नोंदणी क्र. एफ. १८७२० (अहिल्यानगर) या सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेच्या सादरकर्ता श्री डॉ. ज्ञानेश्वर नारायण दराडे यांनी बदल अर्ज चौकशी क्रमांक ५०/२०२६ यामध्ये बदला करिता उपरोक्त बदल अहवाल सादर केलेला आहे व तो मा. धर्मादाय उप आयुक्त यांनी दिनांक १२/०१/२०२६ रोजी तात्पुरता स्विकृत केलेला आहे, त्याअर्थी, हितसंबंध असलेल्या सर्व संबंधीत लोकांना सदर नोटीस द्वारे कळविण्यात येते की, सदर बदल अहवालास आपणास काही आक्षेप / हरकत घ्यावयाची असल्यास, आपण आपली हरकत सदर जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत मा. धर्मादाय उपआयुक्त यांचेसमोर दाखल करावी, अन्यथा, सदर बदल अहवालास आपली काहीही हरकत नाही, असे समजून सदर बदल अर्जावरती दिनांक ३०/११/२०२६ रोजी अंतिम आदेश करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २७ रोजी माहे १० सन २०२६ माझ्या सहीनिशी व धर्मादाय आयुक्तांच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
वरिष्ठ लिपिक

शिक्का

सही/-
अधिक्षक (न्याय),
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अहिल्यानगर विभाग, अहिल्यानगर.

दैनिक
जनता आवाज

अहिल्यानगर, शनिवार, दि. ३१ ऑक्टोबर २०२६, पान नं. ८

विमा क्षेत्रात महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर!

काही विमा कंपन्यांच्या कार्यालयात त्रासाच्या तक्रारी; चिंता

जनता आवाज वृत्तसेवा

श्रीरामपूर : महिला सक्षमीकरण, आर्थिक स्वावलंबन आणि समान संधींच्या घोषणा सर्वत्र केल्या जात असताना, विमा क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांना कामाच्या ठिकाणीच विविध प्रकारच्या त्रासाला सामोरे जावे लागत असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. राज्यातील काही विमा कंपन्यांच्या कार्यालयांमध्ये महिलांना त्रास दिला जात असल्याची चर्चा सुरू असून, त्यामुळे महिला कर्मचाऱ्यांच्या सन्मानासह सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

महिलांनी आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी व्हावे, स्वतःच्या पायावर उभे राहावे आणि पुरुषांच्या बरोबरीने प्रत्येक क्षेत्रात काम करावे, यासाठी शासनाकडून विविध योजना राबविल्या जात आहेत. खासगी क्षेत्रातील कंपन्याही महिला कर्मचाऱ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देत आहेत. मात्र, रोजगाराच्या ठिकाणीच महिलांना मानसिक त्रास किंवा अयोग्य वागणुकीचा सामना करावा लागत असेल, तर महिला सक्षमीकरणाच्या संकल्पनेवरच प्रश्नचिन्ह निर्माण होते. विमा क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर महिला कर्मचारी, प्रतिनिधी आणि अधिकारी कार्यरत आहेत. ग्राहकांशी संवाद साधणे, विमा पॉलिसींची माहिती देणे, व्यवसायवाढीचे उद्दिष्ट पूर्ण करणे, ग्राहकांच्या तक्रारी हाताळणे अशा विविध जबाबदाऱ्या त्यांच्यावर असतात. कामाचा ताण आणि व्यावसायिक उद्दिष्टे पूर्ण करण्याचे आव्हान असतानाच, काही ठिकाणी महिलांना वेगळ्याच स्वरूपाच्या अडचणींना सामोरे जावे लागत असल्याच्या तक्रारी चर्चेत आहेत. कामाच्या ठिकाणी महिलांचा सन्मान आणि सुरक्षितता राखण्याची जबाबदारी संबंधित संस्थांची आहे. महिलांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष न करता त्यांची गोपनीयता राखून निष्पक्ष चौकशी करणे गरजेचे आहे. तसेच, कार्यस्थळी महिलांचा लैंगिक छळ प्रतिबंध, मनाई व निवारण अधिनियम २०१३ (कायदा) अंतर्गत आवश्यक तक्रार निवारण व्यवस्था उपलब्ध आहे का, याची तपासणी होणे महत्त्वाचे आहे.

कायद्यानुसार दहा किंवा त्यापेक्षा अधिक कर्मचारी असलेल्या कार्यस्थळी अंतर्गत तक्रार समिती स्थापन करण्याची तरतूद आहे. या समितीमार्फत महिलांच्या तक्रारींची चौकशी केली जाते. मात्र, प्रत्यक्षात अशी यंत्रणा प्रभावीपणे कार्यरत आहे का, महिलांना तक्रार करण्यासाठी सुरक्षित वातावरण मिळते का, याकडेही लक्ष देण्याची गरज आहे. विशेष म्हणजे, महिलांनी तक्रार केल्यानंतर त्यांच्या नोकरीवर, कामाच्या संधींवर किंवा व्यावसायिक प्रगतीवर परिणाम होण्याची भीती वाटू नये. तक्रारदार महिलांना संरक्षण मिळणे आणि दोष आढळल्यास नियमानुसार कारवाई होणे आवश्यक आहे.

रायफल शूटिंग स्पर्धेत त्रिमूर्तीचे यश

जनता आवाज वृत्तसेवा

नेवासा फाटा : नागपूर येथे दि. २३ ते २५ ऑक्टोबर दरम्यान पार पडलेल्या शालेय राज्यस्तरीय रायफल शूटिंग स्पर्धेत त्रिमूर्ती रायफल शूटिंग अकॅडमीच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

या स्पर्धेत त्रिमूर्तीच्या आठ खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता. त्यापैकी दोन खेळाडूंनी रौप्यपदके पटकावत राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात स्थान मिळवले. त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संचलित दादासाहेब हरिभाऊ घाडगेपाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा विद्यार्थी आर्यन प्रशांत खताळ याने १० मीटर एअर पिस्तूल प्रकारात रौप्यपदक मिळवून राष्ट्रीय स्पर्धेसाठी पात्रता संपादन केली. तसेच महारुद्र नांगरे याने १० मीटर ओपन साईट रायफल प्रकारात रौप्यपदक पटकावत राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात आपले स्थान निश्चित केले.

या यशस्वी खेळाडूंचे त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठानच्या अध्यक्ष ॲड. सुमती घाडगेपाटील, उपाध्यक्ष ॲड. स्नेहल चव्हाण-घाडगेपाटील, सहसचिव श्रुती आमले -घाडगे पाटील, विश्वस्त चेतन चव्हाणपाटील आणि मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. गौरव आमले यांनी मनःपूर्वक अभिनंदन केले. राष्ट्रीय स्पर्धेतील उत्कृष्ट कामगिरी करून संस्थेचा तसेच महाराष्ट्राचा नावलौकिक वाढवावा, अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या. याप्रसंगी प्राचार्य सोपान काळे, प्राचार्या दीपाली बाविस्कर, प्राचार्य प्रशील जोसेफ आदींनी शुभेच्छा दिल्या.

राहुरी शहरातील विकासकामे प्रगतीपथावर

जनता आवाज वृत्तसेवा

राहुरी : राहुरी नगरपरिषदेत विकास आघाडी सत्तेत आल्यापासून माजी नगरविकास व ऊर्जा राज्यमंत्री आमदार प्राजक्त तनपुरे आणि कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अरुणसाहेब तनपुरे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध विकासकामांना गती मिळाली आहे. याअंतर्गत महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान २०२६-२७ (जिल्हास्तर)तसेच नागरी दलितेत्तर वस्ती सुधार योजनेखाली विविध विकासकामांना जिल्हाधिकाऱ्यांची प्रशासकीय मान्यता मिळालेली असून ही कामे वेगाने प्रगतीपथावर आहेत,

उपनगराध्यक्ष हर्ष तनपुरे यांची माहिती

अशी माहिती राहुरी नगरपरिषदेचे गटनेते व उपनगराध्यक्ष हर्ष तनपुरे तसेच नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली.

नागरी दलितेत्तर वस्ती सुधार योजना अंतर्गत, राहुरी नगरपरिषद हद्दितील नगर मनमाड हायवे ते शनी चौकापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे, राजश्री हॉटेल ते जुना देवळाली रोड रस्ता डांबरीकरण करणे, छत्रपती नगर येथील उर्वरित रस्ते डांबरीकरण करणे, प्रभाग क्र. १० मधील किरण तनपुरे घर ते काळे आखाडा रोड व कादरी मंडप ते ग्लोबल शाळेपर्यंत पथदिवे बसवणे, प्रभाग क्र. ११ मध्ये विविध ठिकाणी पथदिवे पोल उभारणे,मुळा धरण पंप हाऊस येथे बसवणे आदी विकास कामांना मान्यता मिळालेली आहेत,तसेच काही कामे प्रगती पथावर आहेत.

या सर्व विकासकामांना मंजुरी मिळण्यासाठी, नगराध्यक्षा डॉ. उषाताई तनपुरे, नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे, उपनगराध्यक्ष व गटनेते हर्षदादा तनपुरे विकास आघाडीचे सर्व सन्मानीय नगरसेवक व नगरसेविका यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. या पाठपुराव्याला यश आले आहे तसेच नगरपरिषदेच्या माध्यमातून शहराचा कायापालट करण्यासाठी प्रशासकीय मंजुरी मिळालेली विकासकामे व प्रस्तावित कामे वेगाने पूर्ण केली जातील, अशी माहिती गटनेते व उपनगराध्यक्ष हर्ष तनपुरे यांनी दिली.

पारनेरमध्ये रेशनच्या तांदळात किडे

मनसेचा आरोप; गुन्हा दाखल करण्याची मागणी

जनता आवाज वृत्तसेवा

पारनेर : दिवाळीचा सण आनंदात साजरा करण्यासाठी सर्वसामान्य नागरिकांची लगबग सुरू असतानाच पारनेर तालुक्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. तालुक्यातील रेशन दुकानांमधून गोरगरीब लाभार्थ्यांना किडे, अळ्या आणि जाळ्या असलेला, बुरसटलेला व आरोग्यास अपायकारक असल्याचा आरोप असलेला तांदूळ वितरित करण्यात आल्याने संताप व्यक्त होत आहे. गरीब जनतेच्या ताटात निकृष्ट धान्य देण्याच्या या प्रकाराची महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने गंभीर दखल घेत प्रशासनाविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पारनेर तालुकाध्यक्ष अविनाश मुरलीधर पवार यांनी या प्रकरणी जिल्हा पोलीस अधीक्षक तसेच पारनेर व सुपा पोलीस ठाण्याच्या निरीक्षकांकडे लेखी फिर्याद दाखल केली आहे. संबंधित अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करून निकृष्ट धान्य जप्त करावे आणि त्याची प्रयोगशाळेत तपासणी करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.मनसेने दिलेल्या तक्रारीनुसार, पारनेर तालुक्यातील रेशन दुकानांवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी असलेल्या तहसीलदार गायत्री सौंदाने यांना दि. २१ व २२ रोजी दोन वेळा लेखी तक्रार देण्यात आली होती. मात्र, तक्रारीनंतरही संबंधित धान्याची तपासणी, जप्ती किंवा वितरणाला स्थगिती देण्याबाबत कोणतीही कार्यवाही झाली नसल्याचा आरोप मनसेने केला आहे.

कारवाईची मागणी

या संपूर्ण प्रकरणाला तहसीलदार पारनेर गायत्री सौंदाने, जिल्हा पुरवठा अधिकारी, अप्पर जिल्हाधिकारी आणि अन्न सुरक्षा अधिकारी हे जबाबदार असल्याचा आरोप मनसेने तक्रारीत केला आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी आपल्या जबाबदारीचे पालन केले नाही, असा दावा करत त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

आत्मा मालिकच्या विद्यार्थ्यांची निवड

जनता आवाज वृत्तसेवा

कोपरगाव : आत्मा मालिक इंग्लिश मिडियम गुरुकुल ॲड. ज्युनिअर कॉलेजच्या चार विद्यार्थ्यांची केंद्र सरकारच्या ऊर्जा मंत्रालयाच्यावतीने आयोजित केल्या जाणाऱ्या राज्यस्तरीय चित्रकला स्पर्धेसाठी निवड झाली. युवराज शिंदे, गौरव चिंचाणे, गुंजन चौधरी आणि प्रियंका पावरा अशी या चार विद्यार्थ्यांची नावे आहेत. येत्या १४ नोव्हेंबर रोजी मुंबई येथे हि स्पर्धा होणार आहे.

ऊर्जा व विजेची बचत, नैसर्गिक साधनसंपत्तीचे संरक्षण आणि पर्यावरणपूरक जीवनशैली याविषयी विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने या चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. गुणवत्तेच्या आधारे या विद्यार्थ्यांची या स्पर्धेसाठी निवड झाली. संस्थेच्या दृष्टीने हि मोठी उपलब्धी समजली जाते. या स्पर्धेच्या पात्रता फेरीत या विद्यार्थ्यांनी रंगांच्या प्रभावी वापरातून आणि सर्जनशील चित्रांच्या माध्यमातून ऊर्जा संवर्धनाचा महत्त्वपूर्ण संदेश मांडला. त्यांच्या कलात्मक अभिव्यक्तीची दखल घेत पुढील राज्यस्तरीय फेरीसाठी त्यांची निवड करण्यात आली.

सद्गुरू आत्मा मालिक माऊली यांच्या कृपाशीर्वादासह विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्टचे अध्यक्ष नंदकुमार सूर्यवंशी, विश्वस्त मंडळातील सदस्य, व्यवस्थापक सुधाकर मलिक, साईनाथ वरपे, आत्मदर्शन बागडे, मीरा पटेल, प्राचार्य माणिक जाधव, मीनाक्षी काकडे, नितीन सोनवणे आदिंनी या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. या विद्यार्थ्यांना कलाशिक्षक ज्ञानेश्वर पर्वत, गोकुळ गायकवाड, निलेश सावंत, स्वप्निल पाटील, संदीप धनवटे व राहुल गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले.

वन्यप्राण्यावर नजर ठेवणारा कॅमेरा चोरीला!

जनता आवाज वृत्तसेवा

पारनेर : वन्यप्राण्यांच्या हालचालींवर देखरेख ठेवण्यासाठी वनपरिक्षेत्र पारनेर अंतर्गत वनक्षेत्रात लावण्यात आलेला ट्रॅप कॅमेरा अज्ञात व्यक्तीने चोरून नेल्याची घटना समोर आली आहे. वन्यजीव संरक्षण आणि संवर्धनाच्या दृष्टीने महत्त्वाचे असलेले शासकीय उपकरण चोरीला गेल्याने वनविभागाकडून या घटनेची माहिती नागरिकांना देण्यात आली असून, कॅमेऱ्याबाबत कोणाला काही माहिती असल्यास ती तातडीने वनविभागाला कळविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

वनक्षेत्रामध्ये वन्यप्राण्यांच्या हालचाली टिपण्यासाठी तसेच त्यांच्या अधिवासावर लक्ष ठेवण्यासाठी वनविभागाकडून ट्रॅप कॅमेऱ्यांचा वापर केला जातो. या कॅमेऱ्यांच्या माध्यमातून वन्यप्राण्यांची ये-जा, त्यांच्या हालचाली आणि वनक्षेत्रातील विविध घडामोडींची नोंद घेतली जाते. त्यामुळे वन्यजीव संरक्षणाच्या कामात या उपकरणाला विशेष महत्त्व आहे. मात्र, पारनेर वनपरिक्षेत्रातील वनक्षेत्रात लावलेला हा कॅमेरा अज्ञात व्यक्तीकडून चोरीस गेल्याचे वनविभागाने जाहीर केले आहे.

या पार्श्वभूमीवर वनविभाग, अहिल्यानगर अंतर्गत वनपरिक्षेत्र पारनेर कार्यालयाने नागरिकांना जाहीर आवाहन केले आहे. परिसरातील कोणत्याही नागरिकाला सदर ट्रॅप कॅमेऱ्याबाबत माहिती मिळाल्यास अथवा या घटनेशी संबंधित संशयास्पद व्यक्ती आढळल्यास तातडीने वनविभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

शासकीय मालमत्तेचे संरक्षण करणे ही केवळ प्रशासनाचीच नव्हे, तर समाजातील प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. वनसंपत्ती आणि वन्यजीवांचे संरक्षण करण्यासाठी नागरिकांनी वनविभागाला सहकार्य करावे, असे आवाहन वनपरिक्षेत्र अधिकारी, वनपरिक्षेत्र पारनेर प्रादेशिक यांच्या वतीने करण्यात आले आहे.

स्मार्ट मीटर सक्तीविरोधात उपोषण सुरूच!

ग्रामसभेचा ठराव धाब्यावर? आश्वासनाची प्रतीक्षा

जनता आवाज वृत्तसेवा

राशीन : राशीन गावातील स्मार्ट मीटर सक्तीच्या मुद्द्यावरून महावितरण प्रशासनाविरोधात ग्रामस्थांचा संताप दिवसेंदिवस वाढत असून, ग्रामपंचायत कार्यालयासमोर बहुजन समाज पार्टीचे अहिल्यानगर जिल्हा प्रभारी दत्तात्रय आत्माराम सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली ग्रामस्थांनी आमरण उपोषण सुरू केले आहे. मात्र, उपोषण सुरू होऊनही कर्जत येथील महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घटनास्थळी येऊन उपोषणकर्त्यांची भूमिका जाणून घेत लेखी आश्वासन दिले नसल्याने उपोषण सुरूच आहे.

दरम्यान, राशीन येथील महावितरणचे अधिकारी जाधव यांनी उपोषणस्थळी येऊन चर्चा केली. मात्र, उपोषणकर्त्यांच्या प्रमुख मागण्यांबाबत ठोस लेखी आश्वासन मिळाले नसल्याने आंदोलन मागे घेण्यास उपोषणकर्त्यांनी नकार दिला आहे. केवळ तोंडी चर्चा करून प्रश्न सुटणार नाहीत, तर प्रशासनाने अधिकृत लेखी भूमिका मांडून ग्रामस्थांच्या तक्रारींचे निराकरण करावे, अशी ठाम भूमिका आंदोलनकर्त्यांनी घेतली आहे. राशीन ग्रामसभेचा ठराव क्रमांक २४/०४, दिनांक २७ जानेवारी २०२६ नुसार स्मार्ट मीटर संदर्भात संबंधित महावितरण अधिकाऱ्यांनी तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. मात्र, या ठरावाची अंमलबजावणी अद्याप का झाली नाही, याबाबत प्रशासनाने लेखी खुलासा द्यावा, असा सवाल उपोषणकर्त्यांनी उपस्थित केला आहे.

फळ विक्रेत्यांच्या हातगाड्यांचा अडथळा

जनता आवाज वृत्तसेवा

श्रीरामपूर : शहरात दर शुक्रवारी आठवडे बाजार भरतो. अक्षय कॉर्नर, आगरकर मळा, सिद्धी विनायक कमान या परिसरात शेतकरी रस्त्याच्या दुतर्फा भाजीपाला विक्रीसाठी बसत असताना शहरातील काही हातगाडीवर फळ विक्री करणारे विक्रेते त्यांच्या हातगाड्या रस्त्याच्या मधोमध उभ्या करून रहदारीला अडथळा निर्माण करीत असतात, त्यामुळे मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होते. त्यामुळे पालिकेने वाहतूक कोंडीवर उपाययोजना करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

अक्षय कॉर्नर, आगरकर मळा, सिद्धी विनायक कमान या परिसरात आठवडे बाजार मोठ्या प्रमाणावर भरत असतो. याठिकाणी बाहेरून येणारे शेतकरी रस्त्याच्या दुतर्फा भाजीपाला विक्रीसाठी बसत असतात. त्याच ठिकाणी हातगाडीवर फळ विक्री करणारे विक्रेते त्यांच्या हातगाड्या रस्त्याच्या मधोमध लावल्याने ये-जा करणाऱ्या बाजार करणाऱ्यांना त्यांची वाहने फिरविणे व वळविणे तसेच ये जा करणे कठीण होऊन बसते. कुणी हातगाडी वाल्यांना सांगावयास गेले असता सदर विक्रेते हमरातुमरीवर येतात. वेळप्रसंगी नागरिकांना मारहाण करण्यास मागेपुढे पाहत नाहीत.

या नगरपरिषदेने हातगाड्यावाल्यांचा बंदोबस्त करावा अन्यथा सर्व नागरिक तसेच भाजीपाला विक्रेते त्यांची दुकाने देखील रस्त्याच्या मधोमध लावतील मग होणाऱ्या परिणामांची जबाबदारी नगरपरिषदेची राहील, असा इशारा प्रकाश मेहेत्रे, अशोक तुपे, सागर शेटे, संघर्ष दिघे, प्रसाद दळवी, किरण कोळपकर, नितीन तोडमल, वाल्मीक भुजाडी, अनिकेत निकम, एस. एम. माळवे, सुनील शेळके, चंद्रकांत वाकचौरे, अरुण पाटील, विक्रांत जठार, संजय पवार, विशाल पवार यांनी केली आहे.

महिलेच्या पोटातून काढली १५ किलोची गाठ

डॉ. विखे पाटील मेमोरियल हॉस्पिटलमध्ये पार पडली शस्त्रक्रीया

जनता आवाज वृत्तसेवा

अहिल्यानगर : डॉ. विखे पाटील मेमोरियल हॉस्पिटल आणि वैद्यकीय महाविद्यालय, अहिल्यानगर येथील तज्ञ डॉक्टरांच्या पथकाने एका ७२ वर्षीय महिलेच्या पोटातून तब्बल १५ किलो वजनाची अंडाशयाची मोठी गाठ शस्त्रक्रियेद्वारे यशस्वीरीत्या काढून वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. ही आव्हानात्मक शस्त्रक्रिया सुमारे तीन तास चालली. शस्त्रक्रियेनंतर रुग्णाची प्रकृती अतिशय चांगली असून तिच्या प्रकृतीत समाधानकारक सुधारणा झाली आहे.

सदर महिला रुग्णाच्या पोटामध्ये मोठ्या आकाराची गाठ तयार झाली होती. या गाठीमुळे पोटावर मोठा ताण निर्माण होऊन रुग्णाला श्वास घेण्यास, लघवी करण्यास तसेच शौचास जाण्यास त्रास होत होता. गाठीचा आकार वाढल्यामुळे रुग्णाच्या दैनंदिन जीवनावरही परिणाम होत होता. तपासण्यांनंतर ही अंडाशयाची गाठ असल्याचे निदर्शनास आले. गाठीचा प्रचंड आकार आणि तिची इतर अवयवांशी झालेली चिकटण ही शस्त्रक्रियेतील प्रमुख आव्हाने होती. या गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियेमध्ये डॉ. अद्वैत वैद्य (कर्करोग शस्त्रक्रिया तज्ज्ञ) आणि डॉ. दीपक गाडेकर (मूत्रविकार तज्ञ) यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. शस्त्रक्रियेदरम्यान गाठ आजूबाजूच्या इतर अवयवांना चिकटलेली असल्याने विशेष काळजी आणि कौशल्याची आवश्यकता होती. रुग्णाच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत डॉक्टरांच्या पथकाने नियोजनबद्ध पद्धतीने शस्त्रक्रिया पूर्ण केली आणि सुमारे १५ किलो वजनाची गाठ यशस्वीरीत्या काढण्यात आली. वृद्ध वयातील रुग्ण, गाठीचा मोठा आकार आणि इतर अवयवांशी असलेली चिकटण या सर्व बाबी लक्षात घेता ही शस्त्रक्रिया वैद्यकीयदृष्ट्या आव्हानात्मक होती. मात्र, तज्ञ डॉक्टरांचे कौशल्य, योग्य उपचारनियोजन आणि रुग्णालयातील वैद्यकीय सुविधांच्या साहाय्याने ही शस्त्रक्रिया यशस्वी झाली. शस्त्रक्रियेनंतर रुग्णाची प्रकृती अतिशय चांगली असल्याने रुग्णालयातील डॉक्टर व उपचार पथकाने समाधान व्यक्त केले.

गोरगरिबांसाठी सुविधा उपलब्ध

डॉ. राधाकृष्ण विखे पाटील अध्यक्ष डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाऊंडेशन यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुजय विखे पाटील यांच्या पुढाकाराने रुग्णालयात सुपर स्पेशलिटीच्या सोई सुविधा गोरगरिबांसाठी उपलब्ध करून देण्याच्या प्रयत्नामुळे हे शक्य झाले आहे. आधुनिक वैद्यकीय उपचार आणि गुणवत्तापूर्ण रुग्णसेवा यांना नेहमीच प्राधान्य दिले जाते.

The Newpaper / Periodical Is Published at AJIT RAMESH MORE On Behalf Of AJIT RAMESH MORE, Printed at SAIVED PRAKASHAN PRIVATE LIMITED, IINDIRA NAGAR, PLOT NO.20, SHIRASGAON, SHRIRAMPUR, AHMEDNAGAR, MAHARASHTRA - 413709. And Published At A/P. KOLHAR BK, TAL - RAHATA, AHILYANAGAR, MAHARASHTRA - 413710, Editor AJIT RAMESH MORE. Daily Janta Awaj, RNI No. MAHMAR/2022/85155.